शुक्रवार, २२ जुलै २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक ५

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


अंतरंग


पनवेलच्या शिवसैनिकांचाही मुख्यमंत्र्यांना पाठिंबा/३

रायगडातील पाणीटंचाईची समस्या सुटणार/५

भारताच्या यतिंदर सिंगने 'मालदीव' जिंकले/८


## राष्ट्रवादीच्या प्रफुल्ल पटेल यांच्यावर ईडीची कारवाई



**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक, अनिल देशमुख यांच्या पाठोपाठ आता प्रफुल्ल पटेल यांच्यावरही ईडीने गुरुवारी (दि. २१) मोठी कारवाई केली आहे. इक्बाल मिर्चीप्रकरणी ईडीकडून ही करवाई झाल्याचे सांगितले जात आहे. वरळी येथील प्लॉट खरेदीप्रकरणी मनी लॉण्डरिंग झाल्याचा आरोप प्रफुल्ल पटेल यांच्यावर ठेवण्यात आला होता. दरम्यान, ईडीने केलेल्या या कारवाईत पटेल यांचे वरळी येथील घर जप्त करण्यात आले आहे. इक्बाल मिर्ची याने हा प्लॉट खरेदी केला होता आणि त्यानंतर हा एका डेव्हलपरने हा प्लॉट डेव्हलप केल्यानंतर यातले काही फ्लॅट पटेल यांना विकले. या व्यवहारात मनी लॉण्डरिंग करण्यात आल्याचा आरोप आहे.

# द्रौपदी मुर्मू देशाच्या नव्या राष्ट्रपती

## पहिल्या आदिवासी महिला सर्वोच्च पदावर विराजमान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रपतीपदासाठी १८ जुलै रोजी मतदान झाल्यानंतर गुरुवारी (दि. २१) संसद भवनात मतमोजणी करण्यात आली. या निवडणुकीत एनडीएच्या राष्ट्रपतीपदाच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू या भरघोस मतांनी विजयी झाल्या असून त्या देशाच्या पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती ठरल्या आहेत. द्रौपदी मुर्मू यांच्या विजयानंतर देशभरात भारतीय जनता पक्षासह आदिवासी समाजबांधवांनी एकच जल्लोष केला. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी द्रौपदी मुर्मू यांना त्यांच्या निवासस्थानी जाऊन शुभेच्छा दिल्या.

आजपर्यंतच्या राष्ट्रपतींच्या यादीमध्ये द्रौपदी मुर्मू या १५व्या राष्ट्रपती ठरल्या आहेत. महिनाभरासाठी कार्यवाहक राष्ट्रपती असलेले मोहम्मद हिदायतुल्लाह याचा उल्लेख यादीत नाही आणि दोनदा राष्ट्रपती झालेले व्ही. व्ही. गिरी यांचा यादीत एकदाच उल्लेख केल्यामुळे मुर्मू या १५व्या राष्ट्रपती ठरतात.



पहिल्या टप्प्यातील मतमोजणीत सुरुवातीपासूनच द्रौपदी मुर्मू यांनी आघाडी घेत त्यांना ८०९ मते आणि विरोधी पक्षाचे उमेदवार यशवंत सिन्हा यांना ३२९ मते पडली. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यातही मुर्मू यांनी आघाडी घेतली. द्रौपदी मुर्मू यांना एकूण ५ लाख ७७ हजार ७७७ मते तर यशवंत सिन्हा यांना दोन लाख ६१ हजार ६० मते मिळाली. मुर्मू यांच्या विजयानंतर देशभरात आदिवासी समाजबांधवांनी जल्लोष केला.

मुंबई येथे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी पेढे भरवून जल्लोष साजरा केला. या वेळी माजी मंत्री गिरीश महाजन, प्रदेश उपाध्यक्ष राज पुरोहित व चित्रा वाघ, प्रदेश सरचिटणीस श्रीकांत भारतीय, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आमदार तमिळ सेल्वन व प्रदेश प्रवक्ते अतुल शाह यांच्यासह अनेक नेते सहभागी झाले होते.

# यंदा दहीहंडी, गणेशोत्सव धूमधडाक्यात होणार साजरे

## राज्य सरकारचा सणांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय



**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे राज्यात दहीहंडी व गणेशोत्सव साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला, मात्र आता कोरोनाचा धोका कमी झाला असल्याने या वर्षी सण मोठ्या धूमधडाक्यात साजरा करता येणार आहेत. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस प्रशासन, सार्वजनिक मंडळांच्या प्रतिनिधींसह गुरुवारी (दि. २१) सह्याद्री अतिथीगृहात बैठक घेऊन निर्णय घेतला.

कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे सर्वच सण साधेपणाने साजरे करण्यात आले. २०२२पासून कोरोनाचा प्रादूर्भाव कमी झाल्याने दहीहंडी व गणेशोत्सव या वर्षीपासून निर्बंधमुक्त करण्यात आले आहेत. दहीहंडीत थरांबाबत सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांप्रमाणे साजरा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

गणेशोत्सव हा पर्यावरणपूरक साजरा करावा, तसेच गणेशमूर्तींच्या उंचीवर असणारे निर्बंधही उठविण्यात आले आहेत. त्याचबरोबर मंडप आणि इतर परवानग्या सुटसुटीत व्हाव्यात यासाठी एकखिडकी योजना आणि ऑनलाईन पद्धतीने परवानग्या देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

मुंबईत जी नियमावली आहे, त्याप्रमाणे राज्यातही व्हाव्यात, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. कायदा-सुव्यवस्था राखून हे उत्सव साजरे झाले पाहिजेत अशा सूचना पोलीस, जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत. पीओपीच्या मूर्तींबाबत निर्णय घेण्यासाठी एक तांत्रिक समिती नियुक्त केली जाणार असून, त्यामध्ये एमपीसीबी, निरी, आयआयटी, एनसीएल आदी संस्थांचे तज्ज्ञ प्रतिनिधी असतील. ही समिती पर्यावरणपूरक मार्ग काढेल असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गणेश पर्व हे महत्त्वाचे आहे. हे पर्व उत्साहात साजरे करण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे. ज्या अडचणी असतील त्या परस्पर सहकार्याने सोडवाव्यात, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीला मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, प्रधान सचिव संजय सक्सेना, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, इतर अधिकारी व विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे प्रतिनिधी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



**पनवेल : माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी नवीन पनवेल येथील पुलावर पडलेल्या खड्ड्यांमुळे वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याने गुरुवारी पाहणी केली. पाहणीदरम्यान माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक नितीन पाटील, उमेश पोतदार, वाहतूक पोलीस उपस्थित होते. हे खड्डे परेश ठाकूर स्वखर्चाने भरणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## छोटा शकीलच्या साथीदाराला अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

व्यावसायिकाकडून खंडणी मागितल्याप्रकरणी गँगस्टर छोटा शकीलचा साथीदार बिल्लो याला मुंबई पोलिसांनी अटक केली.


बेकरी व्यावसायिकाकडून बिल्लोने ३५ लाखांची खंडणी मागितली. खंडणी न दिल्यास त्याला जीवे मारण्याची धमकीही दिली. अखेर व्यावसायिकाने ओशिवरा पोलिसांत तक्रार केल्यानंतर पोलिसांनी बिल्लोला अटक केली. त्याला न्यायालयाने २५ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## निवडक

### आरे मेट्रो कारशेडवरील स्थगिती सरकारने उठवली

**मुंबई** : जवळपास अडीच वर्षांपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पर्यावरण ऱ्हासाच्या कारणामुळे आरेमधील प्रस्तावित मेट्रो कारशेडच्या कामाला स्थगिती दिली होती, तसेच हे कारशेड कांजूरमार्गला हलवण्याची प्रक्रियादेखील सुरू करण्यात आली होती, मात्र आता हा निर्णय विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फिरवला असून आरेमधील मेट्रो कारशेडच्या कामावरची स्थगिती उठवली आहे. त्यामुळे आता तब्बल अडीच वर्ष स्थगित असलेल्या कारशेडचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

### काँग्रेस हायकमांड सोनिया गांधींची ईडीकडून चौकशी



**नवी दिल्ली :** काँग्रेस हायकमांड सोनिया गांधींची गुरुवारी (दि. २१) ईडीने तीन तास चौकशी केली. दुपारी १२वा. च्या सुमारास त्या ईडी कार्यालयात दाखल झाल्या होत्या. त्यानंतर त्यांना सोमवारी (दि. २५) पुन्हा चौकशीसाठी बोलवण्यात आले आहे. तीन टप्प्यात त्यांची चौकशी होणार आहे. पहिल्या टप्प्यात त्यांच्या वैयक्तिक व्यवहाराची चौकशी केली जाणार आहे.

## भाजप प्रदेश कार्यकारिणीची उद्या पनवेलमध्ये बैठक



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाची प्रदेश कार्यकारिणी बैठक शनिवारी (दि. २३) पनवेल येथे होणार आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रमुख मार्गदर्शन असेल, अशी माहिती भाजप प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी दिली.

केशव उपाध्ये म्हणाले की, या बैठकीस भाजप प्रदेश प्रभारी व राष्ट्रीय सरचिटणीस सी. टी. रवी, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाशजी, पक्षाचे राष्ट्रीय पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी, आमदार, जिल्हाध्यक्ष, आणि कार्यकारिणी सदस्य असे सुमारे ८०० प्रतिनिधी उपस्थित राहतील. बैठकीचे उद्घाटन प्रदेशाध्यक्षांच्या संबोधनाने होईल तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाने बैठकीचा समारोप होईल.

बैठकीत माजी प्रदेशाध्यक्ष सुधीर मुनगंटीवार राजकीय प्रस्ताव मांडणार आहेत. ओबीसी राजकीय आरक्षण परत मिळविल्याबद्दल प्रदेश सरचिटणीस चंद्रशेखर बावनकुळे भाजप-शिवसेना सरकारच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडतील. शेतीविषयक प्रस्ताव भाजप किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष वासुदेव काळे मांडतील. दिवसभर चालणाऱ्या या बैठकीत राजकीय सद्यस्थितीविषयी चर्चा होईल, तसेच आगामी कार्यक्रम जाहीर करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या वेळी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मगाव शिरढोण येथील फडके वाड्याचे लोकार्पणही करण्यात येणार आहे. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार रविशेठ पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पुरातत्त्व खात्याकडून एक कोटी ६४ लाख रूपये खर्च करून फडके यांच्या वाड्याची डागडुजी करण्यात आली. शिरढोण ग्रामपंचायतीच्या वतीने फडणवीस यांचे स्वागत करण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे केळवणे जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी दिली.

# तळीयेचा जवान भारतीय सैन्यात ठरला अव्वल

## आई-वडिलांना खरी श्रद्धांजली असल्याची व्यक्त केली भावना

**पाली : प्रतिनिधी**


रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील तळीये दुर्घटनेत आपले संपूर्ण कुटुंब गमावलेल्या बहादूर जवान अमोल कोंडाळकर भारतीय सैन्यात अव्वल ठरला आहे. भारतीय सैन्यात १५० जणांच्या ग्रुपमध्ये कॉम्बॅट इंजिनिअरिंग इन्स्ट्रक्टर या कोर्समध्ये प्रथम येत पदक पटकावले. आई-वडिलांना हिच खरी श्रद्धांजली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.



*माझे गाव व कुटुंबाला माझ्याकडून काहीतरी आगळी वेगळी श्रद्धांजली द्यावी, असे मी मनात ठरवले. त्यासाठी सर्व दुःख मनात दाबून पुन्हा कर्तव्यासाठी रुजू झालो आणि एका कोर्सला सुरुवात केली. दिवसरात्र मेहनत करून मोठ्या जिद्दीने त्या कोर्समध्ये वर्चस्व मिळवले. १५० जणांच्या ग्रुपमध्ये प्रथम क्रमांक व पदक पटकावून माझे युनिट, गाव व कुटुंबाचे नाव उंचावर नेले यात मला आनंद आहे.*

***-अमोल कोंडाळकर,*** *भारतीय जवान*

अमोलने सैन्यात भरती व्हावे व भारतमातेची सेवा करावी ही त्याच्या आई-वडिलांची इच्छा होती. त्यानुसार अमोल पांडुरंग कोंडाळकर हा भारतीय सैन्यात २०१२मध्ये भरती झाला होता. अमोलची आई उषा कोंडाळकर या तळीये राजिप शाळेत आहारिका म्हणून नोकरी करीत होत्या, तर वडिल पांडुरंग कोंडाळकर हे शेती करीत असत. बहीण काजल व पत्नी अश्विनी असा सुखी परिवार होता. २२ जुलै २०२१च्या दरड दुर्घटनेत अमोलने आपले सर्व कुटुंब गमावले, मात्र अमोलने जिद्दीने आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण केले. सध्या तो भारतीय सैन्यामध्ये कॉर्पस् ऑफ इंजिनिअर या पदावर तो नोकरी करतो.

# महाविकास आघाडीमुळे ओबीसी आरक्षणास विलंब

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने सांगूनही महाविकास आघाडी सरकारने तिहेरी चाचणी पूर्ण करण्यासाठी काम केले नाही म्हणून राज्यात ओबीसींचे राजकीय आरक्षण गमावले गेले. अडीच वर्षे वेळ वाया घालविणाऱ्या महाविकास आघाडीने आता ओबीसी राजकीय आरक्षणाचे श्रेय घेऊ नये, असे स्पष्ट प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी पत्रकार परिषदेत केले. दरम्यान, नवे सरकार आल्यानंतर केवळ वीस दिवसात ओबीसींचे राजकीय आरक्षण पुन्हा स्थापित झाल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आपण आभार मानतो असेही पाटील यांनी सांगितले.

सत्तेची सूत्रे हाती आल्यानंतर चार महिन्यात ओबीसींचे राजकीय आरक्षण पुन्हा प्रस्थापित करेन, नाहीतर राजकीय संन्यास घेईन, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जून २०२१मध्ये केली होती. त्यांनी वचन पूर्ण केले आहे, असेही पाटील म्हणाले. भाजपच्या प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत चंद्रकांत पाटील बोलत होते. या वेळी प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ, भाजपा प्रदेश ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष योगेश टिळेकर व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील उपस्थित होते.



चंद्रकांत पाटील म्हणाले की, महाविकास आघाडीला ओबीसींना राजकीय आरक्षण द्यायचे नव्हते, त्यामुळे त्यांनी सर्वोच्च न्यायालयाने सांगूनही समर्पित आयोग नेमणे व एम्पिरिकल डेटा गोळा करण्यासाठी हालचाली केल्या नाहीत. एम्पिरिकल डेटाचे काम करण्याच्या ऐवजी सातत्याने केंद्र सरकारकडे २०११ च्या जनगणनेची माहिती मागून केंद्राकडे बोट दाखवत वेळ वाया घालविला. बांठिया आयोग नेमल्याबद्दल आघाडीचे नेते सांगत असले तरी हे काम मार्च २०२२ मध्ये करण्याच्या ऐवजी आधी का केले नाही आणि एम्पिरिकल डेटा आधी का गोळा केला नाही याचे उत्तर त्यांनी द्यायला हवे.

पाटील पुढे म्हणाले की, महाविकास आघाडीच्या बेफिकीरीमुळे राज्यात ओबीसी राजकीय आरक्षण पुन्हा स्थापित झाले नाही आणि परिणामी मध्यंतरी सहा जिल्हा परिषदांच्या पोटनिवडणुका, भंडारा-गोंदिया जिल्हा परिषदांच्या निवडणुका, १०६ नगरपंचायतींच्या निवडणुका आणि हजारो ग्रामपंचायतींच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय झाल्या. आता ओबीसी राजकीय आरक्षणाबद्दल दावा करणाऱ्या महाविकास आघाडीने याबद्दल उत्तर द्यायला हवे. पाटील यांनी सांगितले की, मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सत्तेची सूत्रे स्वीकारल्यावर तातडीने ओबीसी राजकीय आरक्षणाबाबत आढावा घेतला, बांठिया आयोगाचा अहवाल स्वीकारला, सर्वोच्च न्यायालयात चांगल्या रितीने पाठपुरावा केला त्यामुळे ओबीसी राजकीय आरक्षण परत मिळाले आहे. भाजपा प्रदेश सरचिटणीस चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणात हस्तक्षेप याचिका दाखल केल्यामुळे न्यायप्रक्रियेत सक्रीय सहाय्य करता आले. ओबीसी राजकीय आरक्षण पुन्हा प्रस्थापित होईपर्यंत भाजपा ओबीसींना निवडणुकीत २७ टक्के तिकिटे देईल, अशीही भूमिका जाहीर केली होती व इतरांना त्याचे अनुकरण करावे लागले. ते म्हणाले की, शिंदे-फडणवीस सरकारच्या पुढाकारामुळे मराठा आरक्षण, धनगर आरक्षण, अनुसूचित जाती-जमातींना पदोन्नतीमध्ये आरक्षण हे प्रश्नही सुटतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# काँग्रेसच्या काळात ईडीचा चुकीचा वापर

## भाजप नेते प्रवीण दरेकरांचा हल्लाबोल



**मुंबई : प्रतिनिधी**

नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेसच्या काही नेत्यांवर ईडीकडून कारवाई सुरू झाली आहे. त्यामुळे काँग्रेस आक्रमक झाली असून नेते, पदाधिकाऱ्यांनी राज्यभर आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, यासंदर्भात काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी पत्रकार परिषद घेत भाजप आणि ईडीवर टीकेची झोड उठविली आहे. या टीकेला भाजप नेते, आमदार प्रवीण दरेकर यांनी सडेतोड उत्तर दिले आहे.

प्रवीण दरेकर म्हणाले, गुजरातमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदीही अशा चौकश्यांना सामोरे गेले आहेत. त्यांनी तपास यंत्रणांना प्रतिसाद दिला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीसुद्धा साऱ्या तपास यंत्रणांना सामोरे जात प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे ज्याला कर नाही त्याला डर असण्याचे काही कारण नाही. या आंदोलनाची नौटंकी करून काही साध्य होणार नाही. केंद्रीय यंत्रणा निपक्षपातीपणे काम करत असतात. त्या जाणिवपूर्वक कोणावरही कारवाई करत नाहीत, असेही दरेकर यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कारटे. ईडीची स्थापना केव्हा झाली. ईडीमार्फत देशात कशा पद्धतीने राजकारण झाले कारवाया झाल्या. याचा पूर्वइतिहास काँग्रेसनेच तपासून पहावा. आपल्याला ईडीच्या कारवाया जाचक व्हायला लागल्यावर ईडीवर संशय व्यक्त करायचा. त्यांच्यावर टीका करायची हे बरोबर नाही. इडीचा सर्वाधिक चुकीचा वापर काँग्रेसच्या काळात झाला आहे तपास यंत्रणांचे काम तपास करणे असते. त्यांना काही दोष देण्याचे कारण नाही. ते त्यांच्या कायद्याच्या चौकटीत काम करतात. त्यामुळे काँग्रेसच्या आरोपांना तथ्य नाही असेही दरेकर यांनी स्पष्ट केले.

# पुणे-बेंगळुरू अंतर ९५ किमीने होणार कमी

**मुंबई : प्रतिनिधी**

पुणे-बेंगळुरू ग्रीनफिल्ड कॉरिडॉरमुळे या दोन शहरांतील अंतर ९५ किमीने कमी होणार आहे. शिवाय प्रवासाचा वेळ चार ते पाच तासांनी कमी होणार आहे. ग्रीनफिल्ड कॉरिडॉरमध्ये आपत्कालीन परिस्थितीत विमान उतरण्यासाठी पाच किमी लांबीची दोन एअर स्ट्रीपदेखील असणार आहे. तसेच वेसाइड सुविधांमुळे महामार्गाच्या बाजूलाच चालकांसाठी स्वतंत्र विश्रांती कक्ष, लहान मुलांना खेळण्यासाठी पार्क, हॉटेल अशा सुविधा असतील. महामार्गाच्या दुतर्फा मोठी झाडेदेखील लावली जाणार आहे. एअर स्ट्रीप असलेला हा राज्यातील पहिला राष्ट्रीय महामार्ग असेल.

देशांतील निवडक मार्गावर 'भारतमाला' परियोजना दोन अंतर्गत जवळपास तीन हजार किमीचे रस्ते बांधले जात आहे. हे सर्व रस्ते ग्रीनफिल्ड असतील. यात पुणे-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गाचा देखील समावेश आहे. महाराष्ट्रातील डीपीआरचे काम येत्या काही दिवसांत संपणार आहे. येत्या काही महिन्यांत कर्नाटक राज्यात सुरु असलेले काम देखील संपण्याची शक्यता आहे.

ग्रीनफिल्ड कॉरिडॉर हा पूर्णतः नवीन द्रुतगती मार्ग असणार आहे. जुन्या रस्त्याचे विस्तारीकरण यात केले जात नाही. हे पूर्णतः नवीन मार्ग आहे. यावरून वाहने ताशी १२० किमी वेगाने धावतील. चार, सहा व आठ पदरी असतात. प्रदूषण कमी व्हावे या करिता रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडी असेल. पुणे-बेंगळुरू प्रकल्प असा असणार आहे. यामध्ये वारवे बुद्रुकपासून ग्रीनफिल्ड सुरू. यामध्ये सहा लेन असणार आहेत. संपूर्ण रस्ता डांबरी, सिमेंटचा वापर नाही. १०० मीटर रुंदी (पुणे-मुंबई द्रुतगती मार्गापेक्षा मोठा) असणार आहे. हा ७४५ किमीचा मार्ग (आताचा मार्ग ८४० किमी) आहे. सांगली, सातारा, कोल्हापूर यासह अन्य शहरातून हा मार्ग थेट जाणार नाही. वाहतूक कोंडीचा फटका बसणार नाही. ताशी १२० किमी वेग अवघ्या सात ते आठ तासांत बंगळूरला पोचता येईल. टोल स्टेशनवरून जवळच्या गावांना जाण्यासाठी रस्ता असेल. एक्ससेस कंट्रोलमुळे रस्त्यावरील वाहने थेट महामार्गावर येऊ शकणार नाही. परिणामी अपघात, वाहतूककोंडी टळेल. वाहतूक बाधित न होता आपत्कालीन परिस्थिती विमान थेट महामार्गावर उतरविण्यासाठी पुणे व बेंगळुरू जवळ पाच किमीची एयरस्ट्रीप असणार आहे. एकूण प्रकल्पासाठी सुमारे ३१ हजार कोटींचा खर्च अपेक्षीत आहे.

**प्रस्तावित पुणे-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गाचे डीपीआर तयार करण्याचे काम सुरू आहे. हे काम संपताच जमीन अधिग्रहणाचे काम होईल. मगच प्रत्यक्षात कामाला सुरवात होईल. या मार्गावर प्रवाशांना विविध सुविधा मिळतील. प्रवास वेगवान व सुरक्षित होईल.**

**-संजय कदम, प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पुणे.**

# पनवेल महानगरपालिका विभागप्रमुखांच्या बैठकीत आयुक्तांकडून विविध कामांचा आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ भारत अभियान दोन राबविण्याच्या दृष्टीने आज झालेल्या विभागप्रमुखांच्या बैठकीत आयुक्त गणेश देशमुख यांनी पनवेल शहरातील साफसफाई तसेच स्वच्छतेविषयीच्या विविध मुद्यांवर चर्चा केली. तसेच अहिल्याबाई होळकर भवन आणि माता-बाल संगोपन केंद्र, रमाई आंबेडकर सांस्कृतिक भवन यांना शासकीय मदत मिळविण्यासाठीचे प्रस्ताव तयार करणे, रोज बाजारांच्या निविदाची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध विभागातील विकास कामांचा आढावा गुरुवारी (दि. २१) आयुक्त गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबधित विभागास दिल्या.



या वेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, सहाय्यक संचालक नगररचना ज्योती कवाडे, उपायुक्त विठ्ठल डाके , उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त कल्पिता पिंपळे, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखापरिक्षक विनकुमार पाटील, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, यांच्यासह पालिकेतील सर्व विभांगाचे विभाग प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि तीन प्रभाग कार्यालये बांधणे, महानगरपालिका क्षेत्रात प्लास्टिक बंदी मोहिम प्रभावी अमंलबजावणी, अमृत महोत्सवानिमित्ताने ७५ दिवस सुरू करण्यात आलेल्या प्रिकॉशनरी डोसचे लसीकरण, पंतप्रधान आवास योजना, रोज बाजार निविदा, सरस्वती विद्यालय निष्कांसित करणे, सिडको कडील भूखंड हस्तांतरीत करणे, मालमत्ता करांची बिले पाठविणे, वाहन खरेदी करणे अशा विविध विषयांचा आयुक्तांनी यावेळी आढावा घेतला. तसेच त्या-त्या विभागास कामे गतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने योग्य त्या सूचना संबधितांना दिल्या.

# चार वर्षात एसटी अपघातात १३२ प्रवाशांचा मृत्यू

**मुंबई : प्रतिनिधी**

मध्य प्रदेशातील इंदोरमध्ये एसटी बसच्या अपघातात चालक, वाहकासह दहा प्रवाशाचा मृत्यू झाला. या अपघातात चालकाची चूक नसली तरीही एसटीत होणारे अपघात, वाहतूक नियमांना दिली जाणारी तिलांजली इत्यादी मुद्दे ऐरणीवर आले आहेत. गेल्या चार वर्षांत राज्यात एसटीच्या बसगाड्यांच्या अपघातात १३२ प्रवाशांना जीव गमवावा लागला आहे. तर गेल्या तीन वर्षांमध्ये महामंडळाला अपघातग्रस्त एसटीतील प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना नुकसान भरपाईपोटी १०० कोटी रुपयांहून अधिक रक्कम द्यावी लागली आहे.



राज्यात विविध ठिकाणी एसटीच्या बसगाड्यांचे अपघात चालकाच्या किंवा अन्य वाहनचालकांच्या चुकीमुळे होतात. या अपघातांमध्ये एसटी प्रवाशांना जीव गमवावा लागतो किंवा गंभीर दुखापत होते. २०१८-१९ पासून २०२१-२२ पर्यंत एकूण १००३ प्राणांतिक अपघात झाले. यामध्ये एकूण १३२ एसटी प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. २०१८-१९ आणि २०१९-२० मध्ये अनुक्रमे ३७७ आणि ३६० प्राणांतिक अपघात झाले होते. त्यानंतर कोरोना आणि लागू झालेल्या कडक निर्बंधांमुळे अपघातांची संख्या कमी झाली. २०२०-२१मध्ये १३६ आणि २०२१-२२मध्ये१३० अपघातांची नोंद एसटी महामंडळाकडे झाली. २०२१-२२मध्ये १३ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. अपघातग्रस्त एसटीतील जखमी किंवा मृतांच्या वारसांना एसटी महामंडळाकडून नुकसान भरपाई किंवा आर्थिक मदत दिली जाते. गेल्या तीन वर्षांत ११२ कोटी रुपयांहून अधिक नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. अपघातग्रस्त बसमधील प्रवाशाला झालेल्या जखमांच्या स्वरुपानुसार तत्काळ मदत म्हणून ५०० ते १००० रुपये, मृतांच्या नातेवाईकांना १० हजार रुपये दिले जातात. त्यानंतर सर्व कायदेशीरबाबी पूर्ण करून प्रवाशाचा मृत्यू झाल्यास त्याचे वारस किंवा नातेवाईकांना १० लाख रुपये, कायमस्वरुपी विकलांग होण्याची शक्यता असलेल्या जखमी प्रवाशाला पाच लाख रुपये, अंशत: विकलांगता येण्याची शक्यता असलेल्या जखमी प्रवाशाला अडीच लाख रुपये आणि तात्पुरता विकलांग झालेल्या जखमीला एक लाख रुपये मदत रुपात देण्यात येतात.

# धनुष्यबाणही तुमच्या कामाला येणार नाही

## उद्धव ठाकरेंच्या विधानावर केसरकरांचे प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

तुमच्या कामाला धनुष्यबाणही येणार नाही असे प्रत्युत्तर शिंदे गटाचे समर्थक आमदार दीपक केसरकर यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या टिकेला उत्तर देताना दिले आहे.



राज्यात राजकीय उलढापालथ झाल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, त्याचे पुत्र आदित्य ठाकरे आणि त्यांचे समर्थक पेटून उठले आहेत. शिंदे गटात आमदार, खासदार यांच्या पाठोपाठ नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते राज्यभरातून येऊ लागले आहेत. या एकूणच पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे विरोधकांना उद्देशून बोलताना म्हणाले, माझ्या भात्यातील कितीही बाण घेऊन पळा, पण धनुष्य हे माझ्याकडे आहे, लक्षात ठेवा. शिवसेनेत बंडखोरांनी फूट पाडली नाही तर कुणी पाडली ती जनतेला माहित आहे. उद्धव ठाकरेंच्या या विधानावर दीपक केसरकर यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. बाळासाहेबांच्या विचारापासून दूर गेलात, तर धनुष्यबाणही तुमच्या कामाला येणार नाही, अशी टीका केसरकर यांनी केली आहे. तुम्ही करताय ते योग्य आणि आम्ही करतोय ते अयोग्य, असे होत नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत बाळासाहेबांनी कधी युती केली असती का? असा सवालही केसरकर यांनी उद्धव ठाकरेंना विचारला आहे. आता जी विधाने होत आहेत, त्याचा विचार प्रत्येकाने करायला हवा, असेही केसरकर म्हणाले आहेत.

# उरण येथे शाळेतील मुलांनी बनविल्या आकर्षक राख्या

**उरण : वार्ताहर**

भाऊ-बहिणीच्या अतूट नात्याचा सन म्हणजे रक्षाबंधन होय. बहिणीची रक्षा करणे ही जबाबदारी भावाची असते. रक्षाबंधन सण गुरुवारी दि.११ ऑगस्ट रोजी आहे. या निमित्ताने उरण शहरातील उरण नगरपरिषदेच्या स्वतंत्र सैनिक दत्ता रहाळकर मैदान बोरीजवळ असलेल्या स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान संचलित सीबर्ड (स्वीकार) असलेल्या या विशेष मुलांच्या शाळेतील मुलांनी रक्षाबंधन सणासाठी रंगीबेरंगी राख्या बनविल्या आहेत.

उरण येथील शाळा, सेवाभावी संस्था, त्या राख्या खरेदी करून या मुलांना नेहमीच मदत करीत आहेत. राख्यांचे अनेक प्रकार आहेत. गोंडा राखी, खड्यांची राखी, मोत्यांची राखी, असे प्रकार आहेत. दोन रुपयांपासून ते २५ रुपयांपर्यंत किंमतीच्या राख्या येथे उपलब्ध आहेत.

या राख्या युईएस शाळा, सेंटमेरी कॉन्व्हेंट स्कूल उरण, उरण कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय, श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर शाळा व पालक हे राख्या खरेदी करून मदत करीत आहेत.

उरण-मोरा रोडवरील उरणनगर परिषदेचे स्वातंत्र्यसैनिक दत्ता रहाळकर मैदानामागे, बोरी येथे राख्या मिळतील. शाळेच्या पर्यवेक्षक माधुरी उपाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली राकेश म्हात्रे, मानसी पांचाळ, पल्लवी परदेशी, मयुरी मयेकर, प्रशांत कदम, गणेश जाधव, स्नेहल राणे आदी शिक्षक मुलांना राख्या बनविण्याचे प्रशिक्षण देत आहेत. अधिक माहितीसाठी माधुरी उपाध्ये यांच्याशी संपर्क साधावा असेही कळविण्यात आले आहे.



# शाळाबाह्य मुले शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी आता शिक्षणाधिकाऱ्यांकडे समन्वय

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेणे, शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा नियमित आढावा घेणे, शाळाबाह्य आढळलेल्या विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करणे, पालकांना मार्गदर्शन करणे, शाळाबाह्य विद्यार्थ्यांसंबंधी कामे पूर्ण करण्यासाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना समन्वय अधिकारी म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला. शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या माहितीचे संकलन करून त्याची नोंद करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकाऱ्यांवर असेल.

सर्वोच्च न्यायालयाने स्वत:हून दखल घेत दाखल करून घेतलेल्या याचिकेसंदर्भात राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने शाळाबाह्य विद्यार्थी आणि कोरोना काळात पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणविषयक बाबींची माहिती राज्य शासनाकडून मागवली आहे. या याचिकेच्या अनुषंगाने राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाकडून प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात येणार आहे. त्या संदर्भात माहिती सादर करण्याबाबत राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने दिलेल्या सूचनांनुसार प्रत्येक जिल्ह्यात शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेणे, शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा नियमित आढावा घेणे आदिंसाठी जिल्हा स्तरावर समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती होणार आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे-धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील खाली सविस्तरपणे नमुद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे निश्चित ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-धानसर, ता. पनवेल, जि.-रायगड**

| जमिन मालकांचे नांव | सर्व्हे क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| विनायक गोविंद सांडु | १५६/४/१ | ९७८००.०० पैकी ४८९० चौ. मी./४८.९ गुंठे - अविभक्त हिस्सा | ९७८०.०० |
| | १५६/३ | ४६३०.०० पैकी ३३१.५ चौ. मी./ ३.३१ गुंठे - अविभक्त हिस्सा | ३.३७ |
| | १५६/६/१ | १७२०.०० पैकी १०० चौ.मी./१ गुंठा - अविभक्त हिस्सा | १७२.०० |

तरी सदरहू वर नमुद मिळकतींबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न-आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि. २१/०७/२०२२

**सही/-**
**स्वप्निल अ. उपाध्ये**
**ॲडव्होकेट-पनवेल**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :-** फ्लॅट नं. १०१, अनघा अपार्टमेंट को. हौ. सो., जोशी आळी, पटेल हॉस्पीटलजवळ, पनवेल, ता.पनवेल,जि.रायगड. ४१० २०६, मोबाईल नं. ९०२९१६१९१४.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे-अडिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील खाली सविस्तरपणे नमुद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे निश्चित ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-अडिवली, ता. पनवेल, जि.-रायगड**

| जमिन मालकांचे नांव | सर्व्हे क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| विनायक गोविंद सांडु | १३८/अ/२ | १५१००.०० पैकी ७५५ चौ. मी./७.५५ गुंठे - अविभक्त हिस्सा | ७.९१ |
| | १३८/अ/१ | १६४६०.०० पैकी ८२३ चौ. मी./ ८.२३ गुंठे - अविभक्त हिस्सा | १३.३७ |
| | १३७ | २०४१० पैकी १०२०.५ चौ.मी./१०.२० गुंठा - अविभक्त हिस्सा | ३०.०० |

तरी सदरहू वर नमुद मिळकतींबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न-आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि. २१/०७/२०२२

**सही/-**
**स्वप्निल अ. उपाध्ये**
**ॲडव्होकेट-पनवेल**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :-** फ्लॅट नं. १०१, अनघा अपार्टमेंट को. हौ. सो., जोशी आळी, पटेल हॉस्पीटलजवळ, पनवेल, ता.पनवेल,जि.रायगड. ४१० २०६, मोबाईल नं. ९०२९१६१९१४.

# पनवेलमधून कट्टर शिवसैनिकांचा मुख्यमंत्र्यांना पाठिंबा

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेला हादरा देत वेगळ्या गटाची स्थापना केली तेव्हापासून एकनाथ शिंदे यांना राज्यभरातून आणि विविध स्तरातून समर्थन मिळत आहे. पनवेलमध्येही बुधवारी मोठ्या प्रमाणावर याची सुरुवात झालेली पहावयास मिळाली. पनवेल महानगर क्षेत्राचे संघटक तथा माजी नगरसेवक ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांनी आपल्या ४०० ते ५०० समर्थक कार्यकर्ते व काही शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह एकनाथ शिंदे यांना जाहीर पाठिंबा देत यापुढे शिंदे यांच्या नेतृत्वात काम करण्याचे निश्चित केले.




पनवेलमधील शिवसेनेचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर सोमण यांनी शिवसेनेच्या माध्यमातून आजपर्यंत मोठा संघर्ष केला आहे. शिवसेनेचे निष्ठावान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोमण कुटुंबीयांतील प्रथमेश सोमण यांनी शिंदे गटाला पाठिंबा दिल्याने निश्चितच हा पनवेल शिवसेनेला एक धक्का मानला जात आहे. प्रथमेश सोमण यांनी ही तरुण वयात नगरसेवक म्हणून व त्यानंतर शहर प्रमुख व महानगर संघटक अशा विविध पदांवर अनेक सामाजिक प्रश्न हाताळले असून मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. काल झालेल्या कार्यक्रमात शिंदे यांनी प्रथमेश सोमण यांचे कौतुक केले.

## सोमण यांच्या भूमिकेचे स्वागत

**पनवेलमधील जवळजवळ सर्वच उर्वरित पदाधिकाऱ्यांनी माझ्या भूमिकेचे स्वागत केले असून मला पाठिंबा दिला आहे, तसेच येणाऱ्या काळात आमच्या संपर्कात असणारे अनेक पदाधिकारी शिंदे यांना समर्थन देतील, असा विश्वास प्रथमेश सोमण यांनी व्यक्त केला.**

या कार्यक्रमाची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या अधिकृत ट्विटर हॅंडलद्वारे प्रसिद्ध केली. या कार्यक्रमात सोमण यांच्यासह विभागप्रमुख प्रसाद सोनवणे, शाखाप्रमुख अर्जुन परदेशी, अभिजित साखरे, युवासेना शहर सचिव अभिनय सोमण, शाखाप्रमुख रमेश बेद, दर्यासागर पतपेढीचे संचालक गणेश वाधिलकर, गटप्रमुख नंदकुमार, शिवसेना प्रणित शिवप्रेरणा श्रमिक कामगार सेनेशी संलग्न सर्व पदाधिकारी – कामगार सदस्य, पाली– देवद विचुंबे येथील शिवसैनिक व शिवनगर रहिवास संघटनेचे सर्व पदाधिकारी, महिला उपजिल्हा संघटिका सीमा मानकामे, शाखाप्रमुख यतीन मानकामे, उसरली खुर्द विकास मंचचे कार्यकर्ते, कामोठे परिसरातील विभाग प्रमुख शरद निकम, डॉ. वडगावकर, ज्येष्ठ महिला पदाधिकारी सुलक्षणा जगदाळे, आशिष पनवेलकर यासह शेकडो कार्यकर्ते व शिवसैनिकांनी शिंदे गटात प्रवेश केला.

या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले, ठाणेचे माजी महापौर नरेश म्हस्के, नवीन पनवेल शहर प्रमुख रुपेश ठोंबरे आदी उपस्थित होते.

# खारघर-बेलपाडा अंडरपासची दुरवस्था

## भाजप पदाधिकाऱ्यांचा सिडकोकडे पाठपुरावा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर रेल्वे स्थानकातून बेलपाडा गाव, तसेच खारघरमधील सेक्टर ५, ६ उत्सव चौक मार्गे सेक्टर २१ व टाटा कॅन्सर हॉस्पिटल व पुढे तळोजाकडे जाणारी वाहने यांना जाण्यासाठी अंडरपासची सुविधा सिडकोकडून देण्यात आली आहे. दरवर्षी पावसाळ्यात ह्या अंडरपासची दुरवस्था होत असते, म्हणून भाजप पदाधिकाऱ्यांनी यासंदर्भात सिडकोकडे पाठपुरावा केला आहे.



दरवर्षी या अंडरपासमध्ये पाणी साचते व रस्त्यात मोठमोठे खड्डे पडून पाणी भरते. नेहमीप्रमाणे सिडको थातुरमाथुर मलमपट्टी करते, पण ठोस उपाय करीत नाही. पाणी साचल्याने खड्ड्यांचा अंदाज न आल्याने येथे नेहमीच छोटे मोठे अपघात होत असतात.प्रचंड प्रमाणात वाहतुक कोंडी होते. सिडकोचे सर्व अधिकारी हे सारे जाणतात, पण कायमस्वरुपी उपाययोजना करीत नसल्याने दर पावसाळ्यात हा मार्ग मृत्यूचा सापळा बनून राहिला आहे.

या मार्गासाठी कायम स्वरुपी उपाय करुन जनतेला होणाऱ्या त्रासापासून मुक्त करा, या साठी सिडको कार्यकारी अभियंता श्री रघुवंशी यांना भाजप खारघर मंडलचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल व प्रभाग क्रमांक ५ चे माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांनी निवेदन दिले. या वेळी भाजप कार्यकर्ता विपुल चोटलिया, कृष्णा खडगी उपस्थित होते.

## निवडक

### फसवणूक करणाऱ्या आरोपीला अटक

**पनवेल :** लोन मंजूर करून देतो असे सांगून नागरिकांकडून पैसे घेऊन त्यांची फसवणूक करणाऱ्या आरोपीला तळोजा पोलिसांनी अटक केली आहेत. अमित कुमार यादव (रा. डोंबिवली) असे आरोपीचे नाव आहे. आरोपी हा सामान्य लोकांकडून त्यांना लोन करून देतो असे सांगून त्यांच्याकडून कमिशन म्हणून पैसे उकळतो, परंतु कोणतेही लोन करून देत नाही. अशा प्रकारे आरोपीने मागील चार महिन्यांत वीस ते पंचवीस लोकांकडून आठ लाख रुपये इतकी रक्कम घेऊन फसवणूक केलेली होती. या आरोपीस डोंबिवली येथून अटक करण्यात आलेली आहे. इतर कोणाचीही या व्यक्तीने फसवणूक केली असल्यास तळोजा पोलीस ठाण्याचे सपोनी सुनील गुरव यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### रविवारी ध्यानसाधना कार्यशाळा

**नवीन पनवेल :** श्री धुतपापेश्वर आयुर्वेद ट्रस्ट संचालित इन्स्टिटयूट आफ योग ॲण्ड आयुर्वेद व आरोग्य सेवा समिती पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने ध्यानसाधना कार्यशाळेचे आयोजन रविवारी (दि. २४) सकाळी ७ वाजता नविन पनवेल येथील के. आ. बांठिया विद्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी नवी मुंबईचे योगशिक्षक व निसर्गोपचार तज्ञ तथा योगविद्या निकेतन मुंबईचे उपपिठाधिकारी दुर्गादास सावंत उपस्थित राहणार असून ते उपस्थितांना योगासंबंधी बहुमूल्य मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळा विनाशुल्क असून येणाऱ्या नागरिकांना मोफत प्रवेश दिला जाणार आहे, असे असे आवाहन आरोग्य सेवा समितीच्या कार्यक्रम प्रमुख गीता गुप्ता यांनी केले आहे. या वेळी आरोग्य सेवा समितीचे अध्यक्ष मधुसूदन जोशी, उपाध्यक्ष सुरेश जाधव, योग केंद्र प्रमुख सूर्यकांत फडके उपस्थित होते.

### रसायनीत रिक्षाचालकाला मारहाण

**मोहोपाडा :** तीन प्रवाशांनी रिक्षाचालकाला बेदम मारहाण केल्याची घटना रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. रिक्षाचालक रूपेश शिवाजी देशमुख (रा. गुळसुंदे, रिक्षा क्र. एमएच ४६ एझेड – ६६५१) हे वाशीवली खारपाडा रस्त्याने तीन अनोळखी प्रवाशांना घेऊन जात असताना रिक्षात बसलेल्या प्रवाशांनी लघवीला आली असून रिक्षा थांबव असे सांगितले, परंतु आडवाटेला रिक्षा रूपेश देशमुखने थांबवली नाही. रिक्षा न थांबवल्याचा राग मनात धरून प्रवाशांनी रूपेशला बुक्क्याने तोंडावर व डोक्यास दगडाने मारहाण करून दुखापत केली. रूपेशने याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार करुन प्रवाशांविरूध्द तक्रार केली आहे. याबाबत आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून रसायनी पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक गोरक्षनाथ बालवडकर हे अधिक तपास करीत आहेत.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे वह्यावाटप



पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने गुरुवारी तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या भोकरपाडा येथील शाळेत विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप व शैक्षणिक साहित्यवाटप करण्यात आले. या वेळी भाजप गुळसूंदे जि. प. विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, पोयंजे पं. स. अध्यक्ष प्रवीण ठाकूर, संपर्क प्रमुख सचिन दुर्गे, खानावळे ग्रामपंचायतीच्या सरपंच जयश्री नाईक, सदस्य जगदीश पाटील, वनिता पाटील, वैशाली आगिवले, रविना पाटील, तसेच गणेश आगिवले, महेंद्र पाटील, गणेश पाटील, प्रकाश पाटील आदी उपस्थित होते.



पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने गुरुवारी तालुक्यातील जांभिवली, कराडे, जांभिवली वाडी, घेरावाडी येथील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय टेंबे, जांभिवलीच्या सरपंच रिया कोंडीलकर, सदस्य शेखर जाधव, अमित कोंडीलकर, अनिता कोंडीलकर, माजी सदस्य संदीप गोंडीवले, बुध अध्यक्ष कालूराम जेठू माळी, युवा मोर्चा आपटा अध्यक्ष कल्पेश कोंडीलकर, शक्ती प्रमुख जांभिवली रवींद्र कोंडीलकर, धर्मा कोंडीलकर, मनुहार कोंडीलकर, नितेश कोंडीलकर आदी उपस्थित होते.

# शिंदे-फडणवीस सरकार बांधकाम व्यावसायिकांच्या समस्या सोडवतील -दुधे

**पनवेल : वार्ताहर**

सिडकोच्या अनेक समस्यांना या भागात विकास करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांना सामोरे जावे लागत आहे. अनेक कामे खोळंबली असून सद्याचे शिंदे–फडणवीस सरकार न्याय मिळून देतील व आमच्या समस्या सोडवतील, असा ठाम विश्वास पनवेल परिसरातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक असलेले दुधे बिल्डर्सचे तुकाराम दुधे यांनी व्यक्त केला आहे.

सिडको क्षेत्रात काम करणाऱ्या बांधकाम व्यवसायिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, याबाबत वेळोवेळी सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन सुध्दा या समस्यांचे निराकरण होत नाही. सध्याच्या युतीच्या सरकारकडून आम्हाला पूर्ण अपेक्षा असून सिडको वसाहतीमध्ये काम करतेवेळी बांधकाम व्यावसायिकांना येणाऱ्या समस्या हे सरकार जाणून घेईल. आमच्या समस्यांचे निराकरण करतील, असा ठाम विश्वास तुकाराम दुधे यांनी पत्रकारांशी चर्चा करताना व्यक्त केला आहे. लवकरच संबंधित खात्यातील मंत्र्यांची भेट घेऊन आमच्या समस्या त्यांच्यासमोर मांडू असेही तुकाराम दुधे यांनी या वेळी सांगितले.





**पनवेल : न्हावेखाडी येथे शौचालयाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच मंजुषा ठाकूर, किसन पाटील, अरुणशेठ ठाकूर, सदाशिव ठाकूर, अनंता ठाकूर, रामदास ठाकूर, तुकाराम मोकल, ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, देवेंद्र भोईर, साधना तांडेल, निर्मला ठाकूर, अमृता पाटील, कल्पना घरत, विजया ठाकूर यांच्यासह न्हावेखाडीतील ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते.**



# कष्टकरीनगर शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश

## रोटरी क्लब ऑफ न्यू पनवेलचा उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ न्यू पनवेल व इनरव्हील क्लब न्यू पनवेल यांनी अनेक उपक्रम राबविले असून त्यातील विशेष भाग म्हणजे दुर्गम भागातील कष्टकरीनगर येथे रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत सर्वच्या सर्व म्हणजे ७५ विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व चिक्की वाटप करण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ न्यू पनवेलचे अध्यक्ष प्रदीप डावकर यांनी क्लब करीत असलेल्या उपक्रमाची माहिती देऊन या शाळेत दिवाळीपूर्वी आरोग्य शिबिर व शैक्षणिक साहित्य देणार असल्याचे सांगितले. तुराडे ग्रामपंचायत सदस्य विश्वनाथ गायकवाड यांनी पाहुण्यांचे शाल, गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. तर ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी आभार मानले.

या वेळी रोटरी क्लब ऑफ न्यू पनवेलचे सेक्रेटरी पुष्पराज मेडणे, विश्राम एकडे, इनरव्हील न्यू पनवेलच्या सौ. डावकर, शाळा समिती अध्यक्ष प्राची पाटील, सदस्य सुनील राठोड, मुख्याध्यापक दीपक कासारे, सहकारी शिक्षक अशोक नेटके, अनिता वाघमारे, शर्मिला उपरे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# वाजेकर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभागाच्या वतीने स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी कोर्स उद्घाटन व स्पर्धा परीक्षांची तयारी कार्यशाळा उत्साहात झाली.

कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे तसेच तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून पुण्याचे अजित चहाळ हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार हे उपस्थित होते.



कार्यशाळेच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील व वाजेकरशेठ यांचे प्रतिमापूजन झाले. या वेळी अंधारे यांनी त्यांच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना प्रेरीत केले. त्याच प्रकारे विद्यार्थ्यांस शासकीय अधिकारी कसे होऊ शकतो या बदल मार्गदर्शन केले, तसेच चहाळ म्हणाले की, विद्यार्थ्याने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना सातत्यपूर्ण अभ्यास करणे आवश्यक आहे.

कार्यशाळेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार म्हणाले की, सातत्य आणि प्रयत्न हे दोन घटक विद्यार्थ्याने मध्यवर्ती ठेऊन अभ्यास करणे आवश्यक आहे. या वेळी स्पर्धा परीक्षा ग्रंथ प्रदर्शन व विक्री निवेदन चंद्रकांत खराटे यांनी केले.

प्रस्तावना व पाहुण्यांची ओळख स्पर्धा परीक्षा तयारी प्रमुख डॉ. संदीप घोडके यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. राम गोसावी यांनी मानले. प्रा. रश्मी पूरके यानी सूत्रसंचलन केले. कार्यशाळेस महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर सेवक तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# लोकवृक्षाची मधुर फळे

देशाच्या राष्ट्रपती पदावर विराजमान होणाऱ्या श्रीमती द्रौपदी मुर्मू या पहिल्या आदिवासी आणि दुसऱ्या महिला ठरल्या आहेत. हा आपल्या महान देशातील लोकशाहीचाच खराखुरा विजय आहे. प्रगल्भ लोकशाहीमध्ये तळागाळातील सर्वसामान्य नागरिक सर्वोच्च स्थानी पोहोचू शकतो याचेच हे द्योतक आहे. श्रीमती मुर्मू यांची राष्ट्रपतीपदी झालेली निवड हा जसा लोकशाहीचा विजय आहे, तसेच ते भाजपच्या रणनीतीला आलेले मोठे यश मानावे लागेल.

**ओडिशासारख्या तुलनेने मागास राज्यातील मयुरभंज जिल्ह्यातील एका चिमुकल्या खेड्यात जन्माला आलेल्या श्रीमती द्रौपदी मुर्मू यांची भारताच्या राष्ट्रपतीपदी सन्मानपूर्वक निवड झाली. ओडिशा किंवा पश्चिम बंगालमध्ये संथाल हा आदिवासी समाज आढळतो. गुरुवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्यकृतींमध्ये तसेच त्यांच्या चित्रकृतींमध्ये संथाळी आदिवासी संस्कृतीचे चित्रण आढळते. अतिशय मागास आणि गरीब राहिलेला हा समाज सांस्कृतिकदृष्ट्या मात्र बराच संपन्न मानायला हवा. संथाळी लोकगीते आणि चित्रकला यांचा कलाक्षेत्रातही दबदबा राहिला आहे. श्रीमती मुर्मू या अशा आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व करतात. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी त्यांची उमेदवारी भारतीय जनता पक्षाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवार म्हणून जाहीर केली तेव्हाच त्या भारताच्या पंधराव्या राष्ट्रपती होणार हे स्पष्ट झाले होते. गुरुवारी संसद भवनात झालेल्या मतमोजणीने त्यावर केवळ शिक्कामोर्तब तेवढे झाले. श्रीमती मुर्मू यांची उमेदवारी जाहीर करून भाजपने एका दगडात अनेक पक्षी गारद करण्याचे काम करून दाखवले. अर्थात श्रीमती मुर्मू यांचे कर्तृत्व कमी होते असे नव्हे. आदिवासी समाजात जन्म घेऊनही त्यांनी शिक्षणाची आस धरली आणि पुढे सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात महिलांचे आणि आदिवासी समाजाचे प्रश्न धसास लावण्याचे कामही मोठ्या जिद्दीने केले. श्रीमती मुर्मू यांनी भाजपमध्ये प्रवेश केला, त्या काळात ओडिशामध्ये या पक्षाला काहीच स्थान नव्हते. परंतु अत्यंत निष्ठेने श्रीमती मुर्मू यांनी आपली राजकीय वाटचाल सुरू ठेवली. २०१४ मध्ये भाजपने दिल्ली काबीज केल्यानंतर श्रीमती मुर्मू यांची झारखंडच्या राज्यपालपदी नियुक्ती केली गेली. झारखंड हे आदिवासी बहुल राज्य आहे. तेथे त्यांनी या मागास समाजाचे अनेक प्रश्न धसास लावले. म्हणूनच भारतातील दहा कोटींहून अधिक आदिवासींना खऱ्या अर्थाने प्रतिनिधीत्व मिळाले आहे असे आता म्हणता येईल. श्रीमती मुर्मू यांचा विजय प्रारंभापासूनच निश्चित झाला होता. त्यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर विरोधीपक्षांचे सर्व मोर्चे आणि बुरूज जमीनदोस्त झाले होते. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी विरोधीपक्षांची एकत्र मोट बांधून राष्ट्रपती पदासाठी यशवंत सिन्हा यांची उमेदवारी जाहीर केली खरी, परंतु त्यात काही अर्थ उरला नव्हता. कारण विरोधीपक्षांमध्ये औषधापुरती देखील एकवाक्यता नाही हे कळून चुकले होते. भाजपने जाहीर केलेली श्रीमती मुर्मू यांची उमेदवारी विरोधकांच्या या तथाकथित प्रयत्नांवर बॉम्बगोळ्याप्रमाणेच कोसळली. सिन्हा हे अलिकडेच ममतादीदींच्या तृणमूल काँग्रेसमध्ये दाखल झाले होते. भाजपने श्रीमती मुर्मू यांच्या नावाची घोषणा करताच 'हे नाव आधी कळवले असते तर सर्वसहमतीने निवडीचा विचार करता आला असता' असे उद्गार ममता दीदींनी काढले. त्यामुळे सिन्हा यांच्या उमेदवारीमधील हवाच निघून गेली होती. श्रीमती मुर्मू यांच्या देदिप्यमान विजयानंतर याबाबतीतील राजकारण इतिहासजमा झाले असले तरी लोकशाहीच्या वृक्षाचे मधुर फळ म्हणून ही घटना कायमची नोंदली जाईल.**

# महाराष्ट्राचे लोकनेते 'सेल्फ मेड मॅन' देवेंद्र फडणवीस

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व, कर्तृत्व आणि दातृत्व केवळ महाराष्ट्राला नव्हे, तर अवघ्या देशाला माहिती आहे. त्यांच्याकडे महाराष्ट्राच्या विकासाचा रोडमॅप आहे. नेतृत्व कौशल्य आहे. राजकीय कुशाग्रता आहे तसेच हिंदुत्व आणि प्रखर राष्ट्रवादाची विचारधारा आहे. लोकांचा लोकनेता होण्यास, याव्यतिरिक्त अजून काय हव असतं? त्यामुळेच ते पुन्हा यावेत, ही अवघ्या महाराष्ट्राची इच्छा होती. देवेंद्र फडणवीस यांचा आज (२२ जुलै) रोजी वाढदिवस आहे.**

वयाच्या अवघ्या २१व्या वर्षी राजकारणात आलेला एक तरुण, नगरसेवकपदापासून आपली राजकीय–सामाजिक कारकीर्द सुरु करतो. पुढे वयाच्या २७व्या वर्षी स्वकर्तृत्वाने नागपूर शहराचा महापौर होतो आणि वयाच्या ४४व्या वर्षी महाराष्ट्र राज्याचा तरुण तडफदार मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतो. ही गोष्ट आहे लोकनेते देवेंद्र फडणवीस यांची! त्यांच्या जिद्दीची आणि कार्य कुशलतेची! स्वकर्तृत्वाने आणि मेहनतीने नवं महाराष्ट्राचे व्हिजन डोळ्यासमोर ठेऊन देवेंद्रजी, २०१४ साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आणि आजच्या परिस्थितीत ते राज्याचे लोकनेते आहेत. त्यामुळे देवेंद्रजी खऱ्या अर्थाने सेल्फ मेड मॅन आहेत, हेच स्पष्ट होते.

राजकारणात असणाऱ्या व्यक्तींना राजकारण आणि समाजकारण यामध्ये साधर्म्य साधता येणे खूप गरजेचे असते. एकाचवेळी राजकारण आणि समाजकारण करू शकणारे व त्याच जिद्दीने पुढे जाणारे राजकीय व्यक्ती खूप कमी असतात. यामध्ये महाराष्ट्राचे लाडके नेते देवेंद्र फडणवीस यांचे नाव प्रकर्षाने घ्यावे लागेल. कारण देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून काम करताना, एकाच वेळी अनेक समस्यांना तोंड देऊन, सर्व अग्नीपरीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्याची सचोटी पार करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. त्याचप्रमाणे आजच्या घडीला उपमुख्यमंत्री म्हणून ते महाराष्ट्राच्या विकासाचे कार्य पुढे घेऊन जात आहेत.

२०१४ साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर केवळ पाच वर्षांत जी व्यक्ती जिद्द व आत्मविश्वासाच्या जोरावर महाराष्ट्राला विकासाचा नवा दृष्टीकोन देऊ शकते, ती व्यक्ती या पुढील काळात देखील नवं महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये नक्कीच मोलाचा सहभाग नोंदवेल यात तिळमात्र शंका नाही. कारण देवेंद्र फडणवीस हे एक असे रसायन आहे, जिथे त्यांच्या माध्यमातून राज्याच्या विकासाचा राजकीय, सामाजिक व आर्थिक दृष्टिकोन एकत्रित काम करत असून देखील संयम, त्याग आणि आत्मविश्वास या सर्व गुणांनी ते स्वयंभू व स्वयंपूर्ण आहेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेला आजवर असा लोकनेता लाभलेला नाही, आणि यापुढील काळात देखील लाभेल असे वाटत नाही.

विकासाचे राजकारण करत असताना, होत असलेला विकास हा लोक सहभागातून साधायचा असतो. त्यासाठी एक लोकचळवळ उभी करणे गरजेचे असते. लोकांमध्ये विकासासाठीची ओढ निर्माण करणे आवश्यक असते. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये हे गुण प्रकर्षाने दिसून आले. २०१४ सालानंतर महाराष्ट्र सरकारच्या योजनांपैकी बहुतांश योजना या लोकसहभागातून नावारूपास येणाऱ्या योजना होत्या. त्यामुळेच लोकांनी लोकांसाठी लोकांकरवी चालवलेले राज्य, या लोकशाहीच्या व्याख्येस साजेसे काम देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाले होते. ज्यात जलयुक्त शिवार योजना सर्वात यशस्वी योजना ठरली!

अंत्योदयाची संकल्पना दृढ करत असताना समाजातील सर्व घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा. याकरिता विकासाचे माध्यम म्हणून सरकारने काम करावे. शहरांबरोबर ग्रामीण भागाचा देखील विकास व्हावा. शेतकरी सुजलाम् सुफलाम् व्हावा, पर्यटन क्षेत्राची भरभराट व्हावी. भारतीय संस्कृतीची साऱ्या जगाला माहिती व्हावी. ही भाजपनेतृत्वाची सदैव नीती राहिलेली आहे. यामध्ये विकास पुरुष म्हणून भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयीजी आणि पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांच्या नावाचा आवर्जून उल्लेख केला जातो. पक्ष नेतृत्वाच्या पावलावर पाऊल ठेवत देवेंद्र फडणवीस यांनी देखील हीच नीती वापरून



महाराष्ट्रातील विकासकामे हाती घेतली आहेत. ज्यामध्ये जलयुक्त शिवार, समृद्धी महामार्ग, सेवा हमी कायदा, ओबीसी विभागाला दिलेले प्राधान्य, बुलेट ट्रेन, मेट्रोसारखे प्रकल्प अशा विविध विकासकामांना आजवर प्राधान्य देण्यात आले आहे.

देवेंद्र फडणवीस यांची कार्यपद्धती पारदर्शक असून उत्तरदायित्वाच्या मूल्यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. त्यांनी केलेल्या प्रत्येक कामांमधून हे दिसून येते. पारदर्शकता, सुशासन, सर्वसमावेशकता, अभ्यासपूर्ण मांडणी आणि कामामध्ये गती या मूल्यांचा विचार करून, ते कामे करतात. अशाप्रकारे कामे करणाऱ्या लोकप्रतिनिधींना आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना देखील ते नेहमी प्रोत्साहन देतात. राज्याच्या राजकारणात सक्रीय झाल्यापासून छोट्यागोष्टींपासून मोठ्यात मोठ्या विषयांमध्ये ते स्वतः लक्ष घालतात. राज्याचे मुख्यमंत्री असताना देखील मुंबईतील नालेसफाईची माहिती ठेवणे यापासून ते 'मेक इन महाराष्ट्र' यासारख्या कार्यक्रमाच्या नियोजनापर्यंतच्या सर्व विषयांमध्ये त्यांचे बारकाईने लक्ष होते.

आपला लोकप्रतिनिधी, दिलेली आश्वासने पूर्ण करू शकेल का? याबाबत २०१४ सालापूर्वी जनता संभ्रमात होती. परंतु लोकांचा हाच अविश्वास दूर करण्यासाठी भाजप सरकार प्रयत्न करत आहे. यासाठी सेवा हमी कायदा आणि शेतकरी कर्जमाफीतील पारदर्शकता यांच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीस यांनी लोकांची मने जिंकली. आजच्या घडीला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून देखील त्यांची विकासाची हीच घोडदौड सुरू आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण 'लोकनेते स्व. दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ' व्हावे, यासाठी केवळ आंदोलन उभारले गेले नव्हते, तर एक लोकचळवळ उभी राहिली होती. हा भूमिपुत्रांना लढा होता. याची जाणीव देवेंद्र फडणवीस यांना होती. यासंदर्भात आम्ही वेळोवेळी पाठपुरावा केला होता. यापूर्वी वर्ष लोटली, परंतु स्थानिकांच्या भावनांना आत्ता न्याय मिळाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनभावनेचा आदर करून लोकनेते दि. बा. पाटील साहेबांच्या नेतृत्वाला–कर्तृत्वाला महाराष्ट्र सरकारकडून खऱ्या अर्थाने मानवंदना दिली आहे. स्थानिकांच्या लढ्याचा साक्षीदार म्हणून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे आम्ही आभार मानतो.

युती सरकार सत्तेवर असताना, राज्यातील प्रत्येकाला हे माझं सरकार आहे, असं वाटतं आहे. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये विकासाच्या दृष्टीने पोषक अशी एक लोकचळवळ उभी राहिली असून, याचे संपूर्ण श्रेय देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या भूमिकेवर नेहमी ठाम राहतात. वेळोवेळी त्यात योग्य ते बदल करून निर्णयही घेतात. त्यांच्यावर आलेल्या प्रत्येक संकटांचा संधी म्हणून वापर करतात. प्रत्येक संकटातून ते नव्याने काहीतरी शिकले आणि आपल्या अनुभवाच्या जोरावर त्यांनी मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राचे सरकार अखंडितपणे पाच वर्ष चालवून दाखवले. विरोधी पक्षनेते म्हणून देखील त्यांनी आपल्या कामातून वेगळी छाप पाडली. त्याचप्रमाणे जून २०२२ मध्ये झालेल्या राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीतील त्यांची रणनीतीदेखील महत्त्वाची ठरली.

कोणताही पक्ष अथवा संघटना एका रात्रीत मोठी होत नसते. आज देशात किंवा महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाचे जे प्राबल्य दिसत आहे, त्यासाठी अनेक दिग्गज नेत्यांनी अहोरात्र कष्ट घेतले आहेत. भाजपच्या महाराष्ट्रातील विस्ताराचा विचार केल्यास अनेक ज्येष्ठ नावं डोळ्यासमोर उभी राहतात. पण यातही अद्भुत असे यश मिळवणारे एकच नाव आहे आणि ते म्हणजे देवेंद्र फडणवीस! त्यांची रणनिती आणि विकासाचा दृष्टिकोन यामुळेच आजच्या घडीला महाराष्ट्राच्या ग्रामीण भागापर्यंत भाजपचे संघटन पोहोचले आहे, हे विसरून चालणार नाही! ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी लढणारा नेता, मराठा आरक्षण टिकविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणारा नेता, महाराष्ट्राच्या विकासाची दूरदृष्टी असणारा नेता, राजकारणाकडे समाजसेवेचे माध्यम म्हणून पाहणारा नेता, सत्तेला जनसेवेचे साधन मानणारा नेता तसेच लोककल्याणाचे शिवधनुष्य पेलणारा नेता, महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्याशिवाय दुसरा कोणीही असू शकत नाही! त्यांना आई तुळजा भवानी उदंड आणि निरोगी आयुष्य प्रदान करो, याच सदिच्छा आहेत.

महाराष्ट्राचे लाडके लोकनेते देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा! **–राम प्रहर टीम**



## बदलते तंत्रज्ञान




### ई-चलन भरण्याविषयी जाणून घ्या 'या' चार स्टेप्स

ई–चलन भरणे ही एक सोपी प्रक्रिया आहे आणि तुम्हाला तासन्तास रांगेत उभे राहण्याचीही गरज नाही. आपल्या देशात रहदारीच्या नियमांचे उल्लंघन करणे खूप सामान्य आहे. गाडी चालविताना अनेकदा आपण वाहतूक नियमांचे उल्लंघन करतो. आता या डिजिटल युगात ट्रॅफिक चलनदेखील ई–चलनच्या रूपाने आपल्या मोबाईलवर पोहोचते. परंतु दीर्घ प्रक्रियेमुळे तुम्ही अद्याप चलन भरले नसेल, तर ते भरा. ई–चलन भरणे ही एक सोपी प्रक्रिया आहे आणि तुम्हाला तासन्तास रांगेत उभे राहण्याचीही गरज नाही.

आता जर कोणी नियम तोडले असतील आणि त्यांच्या नावावर चलन कापले गेले असेल तर तुम्ही तुमचे चलन कुठूनही भरू शकता. ई–चलन प्रणालीसाठी एक वेबसाईट आहे, जिथे नागरिक त्यांच्या सोयीनुसार त्यांचे चलन तपशील भेट देऊ शकतात आणि भरू शकतात. दंड आकारण्यासाठी ई–चलन ही वाहतूक पोलिसांची इलेक्ट्रिक आवृत्ती आहे. काही काळापूर्वी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चलनची प्रत्यक्ष प्रत उपलब्ध होत असे, मात्र नवीन प्रणालीनुसार इलेक्ट्रॉनिक प्रत पाठविली जाते. सिस्टममध्ये पारदर्शकता आणणे हा ई–चलनचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय सीसीटीव्हीद्वारे ई–चलन प्रणाली देशातील रस्ते अपघात कमी करण्यात आणि वाहतूक नियमांचे पालन करण्यात मोठी भूमिका बजावत आहे. ई–चलन ऑनलाइन भरण्यासाठी प्रत्येक राज्याची स्वतःची वेबसाइट आहे. याशिवाय रोड ट्रान्सपोर्ट आणि हायवेने ऑनलाइन पेमेंटसाठी आपली वेबसाइटही सुरू केली आहे.

तुम्ही ट्रॅफिक चलन ऑनलाइन कसे भरू शकता, ते जाणून घ्या – सर्वप्रथम echallan.parivahan.gov.in या वेबसाइटवर जा. यानंतर वेबपेजवर दिसणाऱ्या चेक चलन स्टेटस्वर क्लिक करा. यानंतर तुम्ही चलन क्रमांक, वाहन क्रमांक किंवा ड्रायव्हिंग लायसन्स क्रमांक टाकून चलनचा तपशील पाहू शकता. त्यानंतर कॅप्चा कोड टाका आणि गेट डिटेलवर वर क्लिक करा. त्यानंतर तुम्ही ज्या ट्रॅफिक नियमांचे उल्लंघन केले आहे त्याची माहिती तुम्हाला पेजवर दिसेल. त्यानंतर तुम्ही रक्कम भरण्यास सक्षम असाल. अशा पध्दतीने गेल्यामुळे तुमचे काम लवकर होईल आणि तुमचा वेळही यामुळे वाचेल.

# शास्त्रीय ज्येष्ठ गायिका गंगूबाई हनगल

गंगूबाई हनगल यांचा जन्म तेव्हाच्या धारवाड (आताच्या हावेरी) जिल्ह्यात इ.स. १९१३ मध्ये झाला. त्यांनी कर्नाटक–संगीताचे प्राथमिक धडे वयाच्या दहाव्या वर्षांपासून आपल्या आईकडून घेतले. वयाच्या अकराव्या वर्षी, म्हणजे इ.स. १९२४मध्ये, त्यांनी बेळगांव येथे महात्मा गांधीच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या (इंडियन नॅशनल) कॉंग्रेसच्या अधिवेशनात पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना अबुल कलाम आझाद आणि सरोजिनी नायडू यांच्या उपस्थितीत स्वागतगीत गायले. हा त्यांचा पहिला जाहीर कलाविष्कार होता.

गंगूबाईंच्या आई अंबाबाई या कर्नाटक शास्त्रीय संगीत गायिका होत्या. त्यामुळे त्यांच्या बालपणापासून आईने त्यांना संगीताचे प्राथमिक शिक्षण व संस्कार दिले. धारवाड येथे प्रतापलाल व श्यामलाल यांच्याकडे लहान असतानाच त्यांनी काही काळ कथ्थक नृत्याचे शिक्षण घेतले. हिंदुस्थानी गायकीचे शिक्षण त्यांनी कृष्णाचार्य हुळगूर यांच्याकडे घेतले. नंतर १९३८मध्ये सवाई गंधर्व (रामचंद्र गणेश कुंदगोळकर) या किराणा घराण्याच्या गायकांकडे गंगूबाई यांची दीर्घकाळ संगीत साधना झाली. तेथे त्यांना गायक भीमसेन जोशी आणि फिरोज दस्तूर यांची साथ मिळाली. वयाच्या सोळाव्या वर्षी हुबळी येथील वकील व व्यावसायिक गुरुराज कौलगी यांनी सहजीवनासाठी गंगूबाई यांना मागणी घातली. त्यांची पहिली पत्नी नुकतीच निधन पावली होती. ते मितभाषी आणि गाण्याची आवड असणारे होते. या विवाहामुळे त्या हुबळी



येथे वास्तव्यास आल्या. गंगूबाई हनगल यांचे उल्लेखनीय कार्यक्रम व त्यांनी भूषविलेली पदे– १९२५ मध्ये त्या किराणा घराण्याचे अध्वर्यू उस्ताद अब्दुल करीम खान यांच्यासमोर धारवाड येथे त्या गायिल्या. १९२८ मध्ये त्या हुबळीला आल्या. तेथे त्यांनी शामलाल आणि

**निमित्त**

प्रतापलाल यांच्याकडे कथ्थक शिकायला सुरुवात केली. त्याचवर्षी त्यांनी दत्तोपंत देसाई व कृष्णाचार्य यांच्याकडे काही काळ हिंदुस्थानी संगीताचे धडे गिरवले. १९३१मध्ये मुंबईतील गोरेगांव येथे शास्त्रीय संगीताचा पहिला जाहीर कार्यक्रम. १९३२मध्ये हिज मास्टर्स व्हॉइस या मुंबईतील कंपनीने गंगूबाईंच्या गाण्याची पहिली ग्रामोफोन तबकडी काढली. १९३३ मध्ये आकाशवाणी (ऑल इंडिया रेडियो) च्या मुंबई केंद्रावरून त्यांच्या प्रत्यक्ष गाण्याचा कार्यक्रम पहिल्यांदाच प्रसारित झाला. १९३३मध्ये जी. एन. जोशींबरोबर भारतीय भाषेत प्रथमतःच ध्वनिमुद्रित केलेले द्वंद्वगीत आकाशवाणीवरून त्या गायिल्या. १९३५मध्ये पंडित रामभाऊ कुंदगोळकर म्हणजे सवाई गंधर्वांकडे आल्या. सुमारे १५वर्षे त्यांनी सवाई गंधर्वांकडे संगीताचे शिक्षण घेतले व किराणा घराण्याची शैली पूर्णपणे आत्मसात केली. १९५२मध्ये जयपूरच्या राजवाड्यात पंडित नेहरूंसमोर गायन झाले. १९७६ मध्ये धारवाड विद्यापीठात मानद संगीत प्राध्यापक म्हणून लागल्या. १९८२ ते १९८४मध्ये कर्नाटक राज्याच्या संगीत आणि नृत्य प्रबोधिनीच्या अध्यक्षा झाल्या. १९९२ ते १९९४ मध्ये कर्नाटकाच्या विधान परिषदेच्या सदस्या झाल्या. २००२मध्ये वयाच्या ८९व्या वर्षी महाराष्ट्रातील ठाणे शहरांत भरलेल्या सूरसंमेलन कार्यक्रमात दीड तास गायिल्या. एका तासाहून अधिक कालावधीचा त्यांनी केलेला हा शेवटचा कलाविष्कार होता. परदेशांतील त्यांचे विविध कार्यक्रम झाले आहेत.

गंगूबाईंना विविध पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये भारत सरकारने गंगूबाई हनगल त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या नागरी सन्मानांनी अलंकृत केले होते. त्यांना एकूण पन्नासहून अधिक पुरस्कार मिळाले होते. त्यात संगीत नाटक अकादमी पुरस्कार, चार मानद डॉक्टरेट, २४ पुरस्कार यांचा समावेश आहे. किमान नऊवेळा पंतप्रधान व पाचवेळा राष्ट्रपतींकडून त्यांचा खास गौरव झाला होता. गंगूबाई हनगल यांचे संगीय क्षेत्रातील योगदान प्रेरणादायी असेच आहे.

(छाया : संतोष पेरणे)

**क्लिक...क्लिक...!**






**कर्जत : जोरदार पाऊस पडू लागताच सगळीकडे डोंगरातून छोटे–मोठे धबधबे ओसंडून वाहत आहेत. मोठ्यांसह बच्चे कंपनीही या धबधब्याचा आनंद घेताना ठिकठिकाणी दिसून येत आहेत.**

## आरोग्य प्रहर

### केसांच्या वाढीसाठी करा आयुर्वेदिक उपचार

केस गळणे ही एक सामान्य समस्या आहे. जी आपल्यापैकी बहुतेकांना भेडसावत असते. केस गळण्याच्या समस्यांमागे अनेक कारणे आहेत जसे की, हार्मोनल बदल, तणाव, संसर्ग इत्यादी आणि जर ते लवकर बरे झाले नाही तर टक्कल पडणे या सारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. या समस्येवर उपचार करण्यासाठी अनेक उपाय आहेत आणि त्यापैकी एक आयुर्वेदिक उपाय आहे. आयुर्वेदानुसार, तुमच्या हाडांच्या ऊतींच्या गुणवत्तेचा केसगळतीशी जवळचा संबंध आहे. हाडांची ऊती कमकुवत असल्यास केस गळणे हा एक सामान्य परिणाम आहे.



आयुर्वेदिक तेलांमध्ये समाविष्ट असलेले व्हिटॅमिन, कॅल्शियम, फ्लेव्होनॉइड आणि इतर पौष्टिक–समृद्ध गुणधर्म केस गळणे थांबवण्यास आणि रसायनांचा वापर न करता केसांच्या वाढीस मदत करतात. परंतु केसांच्या वाढीच्या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमच्या केसांच्या प्रकारानुसार एक नित्यक्रम विकसित करणे. कोंडा कमी करण्यासाठी उपाय– कोंडा केसांच्या वाढीस हानी पोहोचवू शकतो कारण, यामुळे केस गळतात आणि टाळूचे नुकसान होते. आयुर्वेदिक केसांच्या उपचारांमध्ये कडुलिंब आणि मेथी असते. ज्याचा वापर तुमची टाळू स्वच्छ करण्यासाठी आणि कोंडा समस्या दूर करण्यासाठी केला जाऊ शकतो. औषधी वनस्पती, त्यांच्या अँटीफंगल आणि बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्मांव्यतिरिक्त, केसांच्या विकासास प्रोत्साहन देतो. दाट केसांसाठीचे उपाय– ब्राह्मी, जटामांसी आणि आवळा तेल तुमच्या केसांचा पोत सुधारण्यास मदत करू शकतात. हेअर मास्क लावल्याने केसांना मजबूती आणि खोल पोषण मिळेल. तुम्ही आवळा, कडुलिंब, हीना आणि कोरफड यांसारख्या विविध औषधी वनस्पतींची पेस्ट मिक्स करून तुमच्या टाळूवर आणि केसांवर लावू शकता. यामुळे केस दाट होण्यास मदत होते.

जास्त व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट सामुग्रीमुळे, केस पातळ होण्यासाठी आणि केस गळतीसाठी आवळा हा सर्वात जास्त सुचवलेला आयुर्वेदिक उपचार आहे. आवळ्या व्यतिरिक्त, अकाली केस गळणे यासाठी भृंगराजचे आयुर्वेदिक तेल वापरून नैसर्गिकरित्या उपचार केले जाऊ शकतात. राखाडी केस येणं हे खराब जीवनशैली, तणाव किंवा हार्मोनल बदलांचा परिणाम आहे. तुमच्या केसांमधील मेलेनिनचे प्रमाण नियंत्रित करण्यासाठी भृंगराज असलेले आयुर्वेदिक तेल वापरा, त्यामुळे तुमचे केस काळे राहण्यास मदत होते. दरम्यान, केस गळत असल्यास वेळीच उपाय करणे गरजेचे आहे.

# रायगडातील पाणीटंचाईची समस्या सुटणार

## ▪ पाणीसाठ्यात वाढ; धरणे, पाझर तलाव भरले

**अलिबाग : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या दमदार पावसामुळे रायगड जिल्ह्यातील धरणांच्या पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. पाटबंधारे विभागाची २८ पैकी २० धरणे पूर्णपणे भरली आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या (राजिप) अखत्यारितील आठ लुघपाटबंधारे प्रकल्प आणि ३९ पाझर तलाव पूर्ण क्षमतेने भरले आहेत. जिल्ह्यातील बहूतांश धरणे पुर्ण क्षमतेनी भरल्याने रायगडकरांची पाणीटंचाईची समस्या सुटणार आहे.

रायगड जिल्ह्यात सरासरी तीन हजार १४२ मिलीमीटर पाऊस पडत असतो. या तुलनेत २० जुलैपर्यंत जिल्ह्यात सरासरी १६७८ मिलीमिटर पावसांची नोंद झाली आहे. जुलै महिन्यात एक हजार १८ मिलिमीटर एवढे पावसाचे पर्जन्यमान असते. यंदा २० जुलैपर्यंत एक हजार ३२१ मिलीमीटर पावसांची नोंद झाली आहे. म्हणजेच जुलै महिन्याच्या सरासरीच्या तुलनेत २० दिवसात ११३ टक्के पाऊस पडला आहे. या पावसामुळे जिल्ह्यातील धरणांच्या



(संग्रहित छायाचित्र)

पाणीसाठ्यात वाढ झाली आहे.

रायगड जिल्ह्यात लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत २८ धरणे आहेत. यातील २० धरणे पुर्ण क्षमतेनी भरली आहेत. जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या नऊ लघुपाटबंधारे प्रकल्पापैकी आठ प्रकल्प पुर्ण क्षमेतेने भरले आहेत. कर्जत तालुक्यातील पाथरज प्रकल्पातही ७५ टक्के पाणी साठा जमा झाला असून येत्या काही दिवसात तोही भरण्याची शक्यता आहे. वडाचीवाडी, पहूर, पाखरशेत, कुडली १, सरफळेवाडी हे पाझर तलाव येत्या दोन ते तीन दिवसात भरण्याची शक्यता आहे. त्यांच्यात ९५ टक्क्यांहून अधिक पाणीसाठा जमा झाला आहे. तर कर्जतमधील आर्ढे येथील पाझर तलावात ५० टक्के पाणीसाठा झाला आहे.

# एम इंडिकेटरमधून हटविले लब्धी गार्डनचे नाव

## मध्य रेल्वेने केला नेरळकरांच्या भावनांचा आदर


**कर्जत : बातमीदार**

मध्य रेल्वेच्या नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकाच्या नावापुढे जंक्शन ऐवजी लब्धी गार्डन असे एम इंडिकेटरवर दर्शविले जात होते. याबाबत नेरळ ग्रामस्थ व प्रवाशांनी मध्य रेल्वेच्या ट्विटर हॅण्डल आणि रेल्वेच्या फेसबुक पेजवर तक्रारींचा भडीमार केला. त्याची दखल घेऊन मध्य रेल्वे प्रशासनाने नेरळ जंक्शन स्थानकाच्या नावापुढे लागलेले लब्धी गार्डन हे नाव तत्काळ हटविले. त्याचवेळी मध्य रेल्वेच्या अनेक स्थानकांच्या पुढे असलेल्या बांधकाम साईटची नावे हटविण्यात आली आहेत.

रेल्वे प्रवाशांना एम इंडिकेटर या ॲपवरून गाड्यांची सध्यस्थिती आणि वेळापत्रक यांची माहिती मिळत असते. या ॲपचा वापर दररोज लाखो प्रवासी करीत असतात. त्या ॲपचा वापर करून स्थानकांच्या नावापुढे आपल्या बांधकाम साईटचे नाव लावून त्या त्या स्थानकांचे ऐतिहासिक महत्त्व असलेले नाव पुसून टाकण्याचा प्रयत्न बिल्डर लॉबीकडून सुरु होता. नेरळ रेल्वे स्थानकाच्या




(छाया : संतोष पेरणे)




नावापुढे नेरळपासून चार किलोमीटर अंतरावर असलेल्या एका बांधकाम साईटचे नाव दाखविण्यात येत होते. मुळात ती बांधकाम साईट नेरळ ग्रामपंचायत हद्दीमध्येही नाही. ही बाब २० जुलै रोजी सकाळी सोशल मीडियावरून माहित होताच समस्त नेरळकरांनी मध्य रेल्वे विरुद्ध आपली नाराजी व्यक्त केली.

नेरळ प्रवासी संघटना, भिवपुरी प्रवासी संघटना, कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशन आणि नेरळमधील दर्वेश पालकर, सुमित क्षीरसागर, भास्कर तरे, प्रवीण मोर्गे यांनी थेट रेल्वेच्या ट्विटर हॅण्डलवर तक्रारी केल्या.

सोशल मीडियावरही सकारात्मक चर्चा घडवून आणली. तर एम इंडिकेटर ॲपसोबत संध्या देवस्थळे यांनी चर्चा केली आणि मध्य रेल्वेकडून नेरळ जंक्शन रेल्वे स्थानक नावापुढील बिल्डरचे नाव काढून टाकण्याची कार्यवाही झाली. त्याबद्दल नेरळकरांनी आनंद व्यक्त केला.

# माथेरानमध्ये तीन गाड्यांच्या सायलेन्सरची चोरी

**कर्जत : बातमीदार**

माथेरानच्या दस्तुरी नाका येथील पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या तीन गाड्यांचे सायलेन्सर चोरीला गेल्याची घटना मंगळवारी (दि. १९) रात्री घडली. बुधवारी गाडी मालक गाडीजवळ आले असता हा प्रकार उघडकीस आला. यात दोन गाड्या स्थानिकांच्या, तर एक गाडी मुंबईतील पर्यटकाची आहे.

माथेरानमधीळ प्रशांत कदम, नरेश आखाडे व पर्यटक चिराग पटेल यांनी त्यांची वाहने वन व्यवस्थापन समितीच्या दस्तुरी नाका येथील पार्किंगमध्ये उभी केली होती. बुधवारी सकाळी प्रशांत व नरेश हे त्यांच्या गाडीजवळ आले असता, त्यांच्या गाडी(एमएच-४७, एबी- ९०८७) चे सायलेन्सर गायब असल्याचे समजले. तर कांदिवली मुंबई येथील पर्यटक चिराग हे त्यांच्या गाडीने परिवारासोबत परतीच्या प्रवासाला निघाले असत गाडीला सायलेन्सर नसल्याचे त्यांच्या लक्षात आले.

या चोरीबाबत माथेरान शहर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वन व्यवस्थापन समिती प्रत्येक गाडीमागे १०० रुपये कर आकारत असली तरी येथील गाड्यांची सुरक्षा राम भरोसे आहे. या गाड्यांकडून कर वसूल केला जातो, मग ते येथील वाहनांची काळजी का घेत नाहीत, असा प्रश्न पर्यटक विचारत आहेत.

वन व्यवस्थापन समितीने येथे सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, अशी मागणी वाहनचालक करीत आहेत.

# थकीत बिले अदा करावीत; महावितरण कॉन्ट्रॅक्टर संघटनेची मागणी

**पेण : प्रतिनिधी**

महावितरणची अनेक कामे ठेकेदारी पद्धतीने केली जात आहेत. मात्र कित्येक महिने होऊन गेले तरी महावितरण कंपनीने संबंधित ठेकेदारांची बिले अदा केलेली नाहीत. या थकीत बिलांची रक्कम त्वरित अदा करावी, यासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी रायगड जिल्हा इलेक्ट्रिक कॉन्ट्रॅक्टर्स वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने मंगळवारी (दि. १९) महावितरणच्या पेण येथील मुख्य कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

(छाया : अनिस मनियार)





रायगड जिल्ह्यातील इलेक्ट्रिक कॉन्ट्रॅक्टर महावितरणाच्या अडचणी सोडवण्यासाठी दिवस-रात्र काम करीत असतानासुद्धा वरिष्ठ कार्यालयामार्फत मागील अनेक महिने पेमेंट अदा केले जात नाही. याबाबत वारंवार वरिष्ठ कार्यालयाला निवेदन देऊनही याकडे संबंधित कार्यालय डोळेझाक करीत असल्याने रायगड जिल्हा इलेक्ट्रिक कॉन्ट्रॅक्टर वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

इलेक्ट्रिक कॉन्ट्रॅक्टर वेल्फेअर असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष निलेश पाटील, कार्याध्यक्ष राजेश सानप, उपाध्यक्ष धनंजय पाटील, उपाध्यक्ष यदुराम धुमाळ, शिवराम जंगम, अभिजीत जाधव, सचिव भालचंद्र जोशी, खजिनदार दिनेश पाटील, सल्लागार किरण बोरसे आदीसह जिल्ह्यातील कॉन्ट्रॅक्टर्स या धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महावितरणाने सदर कॉन्ट्रॅक्टरांच्या मागण्या तातडीने न सोडविल्यास भविष्यात आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा वेल्फेअर असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष निलेश पाटील यांनी या वेळी दिला.

महावितरणाचे अधीक्षक अभियंता आय. ए. मुलाणी यांनी धरणे आंदोलनस्थळी भेट दिली व कॉन्ट्रॅक्टर्सच्या मागण्यांची तात्काळ दखल घेऊन सदर निवेदन वरिष्ठांना पाठविण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# नागोठण्यात महिलांचे आरोग्य विषयावर चर्चासत्र

**नागोठणे : प्रतिनिधी**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठणे येथील आनंदीबाई प्रधान महाविद्यालयात महिला विकास कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महिलांचे आरोग्य या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदेश गुरव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या चर्चासत्रात तज्ज्ञ डॉक्टरांनी महिलांचे आरोग्य व त्यांना भेडसावत असलेल्या समस्या तसेच महिलांना उद्भवणारे कॅन्सरसारखे भयंकर रोग यावर



(छाया : राज वैशंपायन)

चर्चा केली. तसेच महिलांच्या आरोग्यासाठी योगासनांचे महत्त्व विषद केले व काही योगासनाची प्रात्यक्षिके सादर केली.

महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांनी प्रास्ताविक केले. नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. हिबा सद्दाम दफेदार आणि साधना गुरव या पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. महिला विकास कक्षाच्या प्रमुख डॉ. स्मिता चौधरी यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती शर्मा हिने केले. डॉ. मनोहर शिरसाठ, डॉ. विकास शिंदे, ज्योती पाटील, चैत्राली पाटील, रुचिता निकम यांच्यासह सर्व स्वंयसेवक विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. अनुजा वाटवे हिने आभार मानले.

# मांडला शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

(छाया : महेंद्र खैरे)



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मांडला येथील राजिप शाळेतील विद्यार्थ्यांना चेतन काशिनाथ आष्टीकर व स्वप्नील सुरेश नांदगावकर या उच्चशिक्षीत मित्रव्दयीने सोमवारी (दि. १८) शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.

प्रभारी मुख्याध्यापिका समिक्षा सुरेश नांदगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली चेतन आष्टीकर व स्वप्नील नांदगावकर यांनी सोमवारी महेश कवळे, रमाकांत ठाकूर, अस्मिता भगत यांच्या सहकार्याने शाळेतील ३० विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, चित्रकला वही, स्कुल बॅग यांचे वाटप केले.

सरपंच सुचिता सुरेश पालवणकर, ग्रामपंचायत सदस्य धर्मेद गायकवाड, तसेच बशीर गोरमे, अनिता नांदगावकर, दत्तात्रेय नांदगावकर यांच्यासह तंटामुक्त समिती अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी या वेळी उपस्थित होते. महेश भगत यांनी आभार मानले.

# माथेरानमध्ये मंगळवारपासून महास्वच्छता अभियान

## श्री सदस्य करणार शार्लोट तलावाची स्वच्छता

**कर्जत : बातमीदार**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून मंगळवार (दि. २६) पासून माथेरानमध्ये महास्वच्छता अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानात माथेरान शहर आणि कर्जत तालुक्यातील हजारो श्री सदस्य सहभागी होणार असून, ते शार्लोट तलावामधील गाळ काढणार असून परिसराची स्वच्छता करणार आहेत.

पावसाच्या पाण्याबरोबर जंगलातील गाळ आणि माती तसेच पालापाचोळा वाहून येऊन शार्लोट तलावाची साठवण क्षमता कमी होत आहे. या तलावातील गाळ काढल्यास माथेरानकरांना आणि पर्यटकांना स्वच्छ आणि मुबलक पाणी मिळणार आहे. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे आप्पासाहेब धर्माधिकारी आणि निरुपणकार सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शार्लोट तलाव आणि परिसरात हजारो श्री सदस्य २६ जुलैपासून चार दिवस महास्वच्छता अभियान राबविणार आहेत. या कामासाठी माथेरान नगर परिषद सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याची माहिती प्रशासक आणि मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी दिली.



# ‘हर घर तिरंगा’ अभियान यशस्वी करा!

## ▪ भाजप माणगाव तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळेंचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेले हर घर तिरंगा हे अभियान यशस्वी करण्याचे आवाहन भाजपचे माणगाव तालुका अध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांनी गुरुवारी (दि. २१) प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना केले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ११ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये हर घर तिरंगा हे अभियान राबविण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

या कालावधीत प्रत्येक नागरिकांच्या घरावर तसेच शासकीय, निमशासकीय कार्यालयावर तिरंगा झेंडा फडकविण्यात येणार आहे.

माणगाव तालुक्यातील सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, तसेच सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करून हे अभियान यशस्वी करावे, असे ढवळे यांनी सांगितले.

**“ हर घर तिरंगाचा अभियानांतर्गत २० बाय ३० इंच आकाराचा राष्ट्रीय तिरंगा ध्वज फक्त ३० रुपयांमध्ये मिळणार आहे. माणगाव तालुक्यासाठी ३६१०० तिरंगा ध्वज उपलब्ध होणार आहेत. हे अभियान यशस्वी करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शन सूचनाप्रमाणे सर्वांनी सहकार्य करावे.**

**–संजयआप्पा ढवळे, अध्यक्ष,**
**माणगाव तालुका, भाजप**

# दुर्गवीर प्रतिष्ठानची मुसळधार पावसात मृगगड संवर्धन व स्वच्छता मोहीम

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील भेलीव गावाजवळील मोक्याच्या ठिकाणी मृगगड हा छोटखानी किल्ला आहे. या किल्ल्यावर मुसळधार पावसात दुर्गवीर प्रतिष्ठान तर्फे संवर्धन व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

दुर्गवीर मार्फत गेली आठ वर्ष मृगगडावर सातत्याने संवर्धन व स्वच्छता मोहीम राबण्यात येत आहेत. या वेळच्या मोहिमेत गडावरील पाण्याच्या मुख्य टाक्यातील दगड व माती चैनपुलीच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आली. उर्वरित टाके पुढील मोहिमेत स्वच्छ केले जाणार आहे. या मोहिमेत मुंबई, नवी मुंबई, कल्याण व भिवंडी येथील एकूण २२ दुर्गवीरांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये एकनाथ अस्वले, मंगेश पडवळे, भूषण पाटील, रुपाली अवघडे, विशाल इंगळे, अमित शिंदे, प्रतिक पाटेकर, मंदार गावकर, नयन पोटे, प्रतीक इंदुलकर, अजित करके, सौरभ भागल, रोशन कदम, करण गुळवी, किशोर सावरकर, चेतन रावल, मनोज तरडे, ओम जगताप, प्रतीक भोनकार, रुपेश दळवी, श्रीहरी पवार, सीमा पाटील, योगेश पाटील यांचा समावेश आहे.



# नवी मुंबई महापालिका प्रभाग रचना चुकीची

## नवीन करण्यासाठी मागणी करणार –नाईक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या प्रभाग रचना चुकीच्या पद्धतीने करण्यात आली आहे. ही बाब राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणून दिली असून नव्याने प्रभाग रचना निर्माण करण्याची मागणी केली असल्याचे आमदार गणेश नाईक यांनी नेरूळ येथे बोलताना सांगितले. नवी मुंबईतील तीन नगरसेवकांच्या भाजप प्रवेशाबाबत बोलताना नवीन गवते कुटुंब शिवसेनेच्या शिंदे गटाचे नसून ते आमचेच होते, असे त्यांनी बोलताना स्पष्ट केले.

भारतीय जनता पक्ष नेरूळ–कुकशेत, प्रभाग क्र. ३४च्या विद्यमाने सलग चार दिवस विविध सामाजिक उपक्रम माजी नगरसेवक सुरज पाटील यांच्या पुढाकाराने सुरू आहेत. नवी मुंबई स्तरीय पावसाळी क्रिकेट स्पर्धा, गुणवंत विद्यार्थी गुणगौरव,



नेरूळ सेक्टर ८, कुकशेत आणि सारसोले येथील ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्री वाटप, ज्येष्ठांचा सत्कार आदी विधायक उपक्रम सुरू आहेत.

या वेळी मनपाच्या माध्यमातून इंग्रजी माध्यम, सिबीएससी शाळा, ज्युनिअर कॉलेज, सुसज्ज व्यायामशाळा, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे आदी विधायक उपक्रम सतत राबवत असणाऱ्या माजी नगरसेवक सुरज पाटील आणि सुजाता पाटील दाम्पत्यास प्रोत्साहित करण्यासाठी माजी मंत्री गणेश नाईक नेरूळमधील झुलेलाल मंदिर हॉल मधील कार्यक्रमात आले असताना बोलत होते.

या वेळी व्यासपीठावर माजी मंत्री गणेश नाईक, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, माजी नगरसेविका शुभांगी पाटील, सुजाता पाटील, जयश्री ठाकूर, अॅड. निरंत पाटील, माजी सरपंच बाळाराम पाटील, अभियंता विरेंद्र लगाडे, बजरंग माने आदी उपस्थित होते.

आमदार गणेश नाईक पुढे म्हणाले की, नवी मुंबई मनपाची घरपट्टी आणि पाणीपट्टी आणखी २०वर्षे वाढू देणार नाही. ५०० चौ. फूट ते ७०० चौ. फूट घरांच्या मालमत्ता करात सूट देण्याचा निर्णय आगामी काळात घेण्यात येईल, तसेच व्यापाऱ्यांची पावसाळी वेदर शेडची मागणी नगरविकास विभागाशी बोलून निकाली काढू असे नाईक यांनी बोलताना सांगितले. या वेळी उत्कृष्ट कलाविष्कार रेखाटणाऱ्या मधुरा भोईर याचा विशेष सत्कार करण्यात आला.

# जनरल कामगार संघटनेकडून जेएनपीए प्रशासनाला संपाची नोटीस

**उरण : बातमीदार**

जेएनपीए बंदरात जवळपास ९५० कामगार विविध सोसायट्यांमध्ये कॉन्ट्रॅक्ट वर्कर्स म्हणून काम करीत आहोत. त्यांच्या वेतन कराराचा कालावधी संपून २७ महिने झाले तरी जेएनपीए प्रशासन नवीन करारावर सह्या करण्यास चालढकल करीत आहे. याच्या निषेधार्थ जेएनपीए जनरल कामगार संघटनेच्या वतीने एक दिवसीय संपाची नोटीस जेएनपीए प्रशासनाचे चिफ मॅनेजर (सेक्रेटरी) जयंत ढवळे यांना युनीयनचे अध्यक्ष सुरेश पाटील व कार्याध्यक्ष सुधीर घरत, जनरल सेक्रेटरी जनार्दन बंडा यांनी दिली.

जेएनपीएमध्ये कॉन्ट्रॅक्ट वर्कर्स हे स्थानिक प्रकल्पग्रस्त असून विविध सोसायट्यांमध्ये कार्यरत आहेत. जुना करार ३१ मार्च २०२० रोजी संपुष्टात आला. २७ महिन्यांचा कालावधी होऊनसुध्दा विशेषतः जेएनपीएचे चेअरमन यांच्या समवेत झालेल्या चर्चेत युनियनचे सल्लागार आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत पगारवाढ व इतर सर्व विषयांवर चर्चा पूर्ण होऊनसुध्दा करारावर सह्या करण्यास प्रशासनाचे अधिकारी टाळाटाळ करीत आहेत.



### सूचना देऊनही दुर्लक्षच –सुधीर घरत

कामगारांना केंद्रीय किमान वेतन द्यावे, अशा सूचना जेएनपीएचे चेअरमन यांनी देऊनसुध्दा अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत. हे अधिकारी स्वतःला जेएनपीए चेअरमनपेक्षा मोठे समजतात काय? असा सवाल युनियनचे कार्याध्यक्ष व भारतीय पोर्ट अॅण्ड डॉक मजदूर महासंघाचे कोषाध्यक्ष सुधीर घरत यांनी केला आहे.

अंतिम चर्चा होऊन तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होऊनसुध्दा प्रशासनातील झारीतील शुक्राचार्य वेळकाढूपणा करीत आहेत. याच्या निषेधार्थ जेएनपीटी जनरल कामगार संघटनेच्या वतीने २९ जुलै २०२२ रोजी एक दिवसीय कामबंद आंदोलन करण्याची नोटीस प्रशासनाला दिली आहे. या वेळी संघटनेचे जनरल सेक्रेटरी जनार्दन बंडा, मिन्नाथ भोईर, हरेश मढवी व इतर कामगार उपस्थित होते.

# हात होड्यांची नोंद केली जावी –मेहेर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईत जिथे मासेमारी केली जाते अशा खाडीकिनाऱ्यांवर तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकांकडून केवळ सिलिंडरवर चालणाऱ्या होड्यांचीच नोंदणी केली जात आहे. त्यामुळे हात होड्यांचीदेखील नोंद व्हावी, अशी मागणी कोलवानी माता मित्र मंडळाचे अध्यक्ष मनोज मेहेर यांनी केली आहे.

वर्षानुवर्षे केवळ सिलेंडरवर चालणाऱ्या होड्यांची शासनाकडून नोंद होते परिणामी, हातहोड्यांची नोंद केली जात नसल्याने त्यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत, अर्थसहाय्य वा आपत्कालीन नुकसानभरपाई मिळत त्यामुळे ऐरोली ते दिवाळे पर्यंतच्या सुमारे २००० मच्छीमारांच्या हातहोड्यांची नोंद केली जावी अशी मागणी मच्छीमार संघटनेकडून केली जाणार असल्याचे दिवाळे येथील कैलास नारायण कोळी यांनी सांगितले.

नवी मुंबई शहरास मोठा खाडीकिनारा लाभला आहे. आजही हातहोडीतून सर्रास मासेमारी केली जाते. मोजक्याच मच्छीमारांकडे मोठ्या ट्रॉलर आहेत. काहींकडे सिलेंडरवर चालणाऱ्या होड्या आहेत.

नवी मुंबईतील मच्छीमारांना पालघर येथील मत्स्य विभागाकडून परवानगी व कौल दिला जातो, परंतु समुद्रात जाताना हातहोड्यांचीही नोंद करणे गरजेचे आहे पण नोंद केली जात नसल्याने मच्छीमारांना अनेक सेवा सुविधांचा लाभ घेता येत नसल्याचे ज्ञानेश्वर कोळी यांनी खंत व्यक्त केली आहे.

# सीवूड्स येथे स्लॅब कोसळून एक व्यक्ती जखमी


**नवी मुंबई : बातमीदार**


सीवूड्स येथील बी २६/११ गुरुकृपा सोसायटी सेक्टर ४८ येथे राहणाऱ्या संजय पवार यांच्या घराचा स्लॅब गुरुवारी मध्यरात्री कोसळला. यात ते जखमी झाले. त्यांच्या कानाला जखम झाली असून सात टाके पडले आहेत.

संजय पवार आपल्या सदनिकेत हॉलमध्ये झोपले होते. त्यावेळी पहाटे चार वाजता अचानक आवाज झाला. यात त्यांचाही अंगावर प्लास्टर पडले होते. या यात त्यांना जखम आहे. सुदैवाने यात मोठी दुर्घटना घडली नाही. तसेच घरातील फर्निचरचे नुकसान झाले. या घटनेने सीवूड्स येथे सिडकोच्या घरात राहणाऱ्यांचे धाबे दणणाले आहेत. सुदैवाने पवार यांचे कुटुंबीय बेडरूममध्ये झोपले असल्याने ते बचावले. या घटनेने सिडकोच्या घरांचा आदित्य ऐरणीवर आला आहे.

**सिडको वसाहतीमधील नागरिकांचे बळी जाण्यापूर्वीच या विषयी तातडीने मार्ग काढावा. या इमारतींच्या दुरुस्तीस सुरुवात करावी. या सोसायट्यांमध्ये सामान्य नागरिक राहत असल्याने त्यांना इमारत दुरुस्तीचा खर्च परवडणारा नाही. सिडकोने अंतर्गत व बाह्य बाजू दुरुस्त करून घ्याव्यात. याबाबत सिडको एमडी यांची भेट घेणार आहे.**

**–भरत जाधव, माजी नगरसेवक, भाजप**







**पनवेल : खांदा कॉलनीमधील विविध समस्यांबद्दल नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजप खांदा कॉलनी सरचिटणीस भिमराव पोवार यांनी सिडकोचे कार्यकारी अभियंता श्री. रामन्ना यांना निवेदन दिले. या वेळी सिडकोचे अधिकारी श्री. डेकाटे उपस्थित होते. खांदा कॉलनी परिसरामध्ये पाहणी करून तातडीने कार्यवाही सुरू होईल, असे आश्वासन सिडकोतर्फे देण्यात आले.**

# पनवेलच्या सायली ठाकूरची भरारी

## उपमुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नेरे गावातील सायली श्याम ठाकूर महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत ओबीसी महिला प्रवर्गातून प्रथम आली असून तिची उपमुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती झाली आहे. सायलीच्या उत्तुंग यशाबद्दल बुधवारी (दि. २०) पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही देण्यात आल्या.

पनवेल तालुका पोलीस ठाण्यात झालेल्या या सन्मान सोहळ्यावेळी निरीक्षक (गुन्हे) अंकुश खेडकर, सहाय्यक निरीक्षक भोईर, सायली ठाकूर हिचे कुटुंबीय, पोलीस ठाण्यातील अधिकारीवर्ग आदी उपस्थित होते. सायलीच्या यशाबद्दल तिच्यावर पनवेल, नवी मुंबई सह संपूर्ण परिसरातून अभिनंदनाचा व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

सायलीच्या या यशाबद्दल तिचे वडील श्याम शंकर ठाकूर, आई उषा श्याम ठाकूर, बहिण शामली भगत व भाऊ उज्वल ठाकूर यांच्यासह गुरुजन व संपूर्ण कुटुंबियांचा मोलाचा वाटा आहे. सायलीचे वडील नोकरी करीत असून आई गृहिणी आहे. विशेष म्हणजे शासकीय सेवेत अधिकारीपदी नियुक्ती झालेली सायली ही तिच्या कुटुंबातील व पनवेलच्या ग्रामीण भागातील पहिलीच मुलगी आहे.

सायलीने शासकीय अधिकारी व्हावे असे तिच्या आईवडिलांचे स्वप्न होते. त्यामुळे अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असताना सायलीने एमपीएससीची तयारी सुरू केली. आई वडिलांचे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मोठ्या बहिणीकडून प्रेरणा मिळाली असून आज खऱ्या अर्थाने कष्टाचे चीझ झाल्याची भावना सायलीने व्यक्त केली.


# हर घर तिरंगा उपक्रमात महिला बचत गटांचाही सक्रीय सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

हर घर तिरंगा उपक्रमासाठी मोठ्या प्रमाणात राष्ट्रध्वजांची गरज लागणार आहे. याकामी महिला संस्था व महिला बचत गट यांचा प्रत्यक्ष सहयोग देखील पालिकेला लाभणार आहे. महिलांच्या कलागुणांना वाव मिळेल. त्यांना रोजगार उपलब्ध होईल व राष्ट्रीय कार्यात त्यांचे सक्रिय योगदान राहील, असे सांगत नवी मुंबई पालिका अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी या संधीचा महिलांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

'हर घर तिरंगा' उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणी करिता नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध स्तरांतून प्रयत्न करण्यात येत असून या अनुषंगाने विष्णुदास भावे नाट्यगृहात आयोजित महिला बचत गट व संस्था यांच्या कार्यशाळेप्रसंगी त्या आपले मनोगत व्यक्त करीत होत्या.

या वेळी प्रशासन विभागाचे उपायुक्त जयदीप पवार, समाज विकास विभागाचे उपायुक्त



दादासाहेब चाबुकस्वार व सहाय्यक आयुक्त संजय तायडे, वाशी विभागाचे सहाय्यक आयुक्त सुखदेव येडवे, समाजविकास अधिकारी सर्जेराव परांडे उपस्थित होते. प्रशासन विभागाचे उपायुक्ता जयदीप पवार यांनी कोणत्याही कामात महिलांचा सहभाग असेल तर ते काम यशस्वी होते असे सांगत हर घर तिरंगा या मोहिमेचा प्रचार व प्रसार करण्यात महिलांचे योगदान मोठे असेल असा विश्वास व्यक्त केला. यावर्षी स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष असून त्या निमित्त वेगळ्या जल्लोषात हर घर तिरंगा उपक्रम राबवावयाचा आहे. यामध्ये प्रत्येकाने स्वयंस्फुर्तीने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

समाज विकास विभागाचे उपआयुक्त दादासाहेब चाबुकस्वार यांनी महिला बचत गटांमार्फत तिरंगी झेंडे बनविणे कामात बचत गटांना महानगरपालिकेचे संपूर्ण सहकार्य असेल असे सांगितले. १२ द १८ इंच आकारात खादी, स्पन, लोकर, सिल्क, पॉलिस्टर कापडाचे झेंडे बनवावयाचे असून कार्यशाळेवेळी उपस्थित ९६ बचत गटातील महिलांना या राष्ट्राभिमानी कार्यात सक्रिय योगदान देण्याचे त्यांनी आवाहन केले. याशिवाय 'हर घर तिरंगा' उपक्रम घराघरापर्यंत पोहचविण्यासाठी प्रत्येक महिला संस्था व महिला बचत गट प्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी मुक्ताई महिला बचत गट ऐरोली यांच्या महिला प्रतिनिधींनी देशभक्तीपर गीत तसेच आई महालक्ष्मी बचत गट घणसोली यांच्या प्रतिनिधींनी महिला सक्षमीकरणावर आधारित समुह गीत सादर केले.

**केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्धापनदिनानिमित्त 'हर घर तिरंगा' मोहिम राबविली जात असून यामध्ये प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तसेच सोसायटी, कार्यालय व संस्थांमध्ये ११ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वयंस्फुर्तीने तिरंगा फडकावयाचा आहे. प्रत्येक नागरिकाने 'हर घर तिरंगा' उपक्रमात उत्साहाने सहभाग घ्यावा.**


**–अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई पालिका**

# आपटा येथे नऊ फुटी अजगराला जीवदान

**रसायनी : प्रतिनिधी**

गेल्या पंधरा–वीस वर्षांपासून आपटा येथील सर्पमित्र मनोहर कुलकर्णी हे विषारी बिनविषारी साप पकडून त्या सापांना जीवदान दे त सुरक्षित ठिकाणी सोडतात. मनोहर कुलकर्णी आजपर्यंत कित्येक विषारी बिनविषारी सापांना जीवदान दिले आहे. अशाच एका नऊ फुटी अजगराला त्यांनी जीवदान दिले आहे.

पनवेल तालुक्यातील आपटा येथील पिंपळ आळी येथे राहणारे प्रसाद टेंबे यांच्या घराजवळ मंगळवारी रात्री दहाच्या सुमारास एक भला मोठा साप निदर्शनास आल्याने त्यांनी तत्काळ सर्पमित्र मनोहर कुलकर्णी यांना माहिती दिली. मनोहर यांनी क्षणाचाही विलंब न लावता टेंबे यांच्या घराशेजारी ते पोहचले आणि सर्पमित्र मनोहर कुलकर्णी यांनी नऊ फुटीचा भलामोठा अजगर मोठ्या हिमतीने पकडून त्याला जीवदान दिले.



एवढा मोठा नऊ फुटीचा अजगर पाहून येथील नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली होती, परंतु सर्पमित्र मनोहर कुलकर्णी व त्यांचे वडील ज्येष्ठ पत्रकार बी. एस. कुलकर्णी यांनी हा अजगर पकडल्याने तेथील नागरिकांनी त्यांचे कौतुक केले. हा अजगर शेवटी अभयारण्यात सुखरूपपणे सोडण्यात आल्याचे समजते.

# पनवेलमध्ये देहविक्री करणाऱ्यांना शिक्षित करण्यासाठी कार्यशाळा


**पनवेल : वार्ताहर**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत पंचायत समिती, पनवेल यांच्या सभागृहामध्ये देहविक्री करणाऱ्यांना शिक्षित करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महिला बाल विकासा कडील योजना, तहसीलकडील योजना, एड्स नियंत्रण बाबत महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा न्यायाधीश तथा सचिव जिल्हा विधी समिती यांचे अध्यक्षतेखाली हे आयोजन करण्यात आले.



शासनाने विधी सेवा प्राधिकरणामार्फत देहविक्री करणाऱ्यांना शिक्षित करण्यासाठी कार्यशाळा आयोजित कराव्यात, असे निर्देश केले होते. त्यानुसार पनवेल येथे कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. या कार्यशाळेत एम. एम. गुंजाळ यांनी देहविक्री करणाऱ्यांना शिक्षित करणे आणि तस्करी व लैंगिक शोषणाचे बळी यांच्यासाठी असलेल्या योजनांची माहिती दिली. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील विविध योजनांची माहिती दिली. महिला बाल विकास अधिकारी अशोक पाटील यांनी महिला बाल विकास कडील योजना समजावून सांगितल्या.

पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी तहसीलकडील योजनांची माहिती देऊन महिलांना मार्गदर्शन केले. जिल्हा एड्स नियंत्रण कमिटीचे नियोजन अधिकारी यांनी एड्सबाबत बहुमूल्य मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव अमोल शिंदे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.



# अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यात दाणादाण

## ■ १२७ घरांची पडझड, एकाचा मृत्यू, ५९७ कुटुंबे स्थलांतरित

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सर्वत्र दाणादाण उडाली. जिल्ह्यात विविध ठिकाणी १२७ घरांची पडझड झाली. एकाचा मृत्यू तर एक जण जखमी झाला आहे. प्रशासनाने खबरदारी घेत तब्बल ५९७ कुटुंबीयांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केले आहे.

पाली-खोपोली राज्य महामार्गावरील पाली येथील अंबा नदी पुलावरून सलग तीन ते चार दिवस पाणी गेल्यामुळे येथील वाहतूक कित्येक तास कोळंबली होती. याच मार्गावर तकसई गावाकडे जाणारा पूल पाण्याखाली गेल्यामुळे येथील वाहतूक बंद करण्यात आली होती. परिणामी प्रवासी व वाहन चालक यांची खूप गैरसोय झाली.

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नैसर्गिक आपत्ती दैनंदिन अहवालातील माहितीनुसार जिल्ह्यात पूर्णतः पडलेली घरे १८ आहेत. त्यात सात पक्क्या घरांचा समावेश आहे. त्यामध्ये मुरूड आदिवासी वाडी, खानाव (ता. अलिबाग), साई (माणगाव), तामसोली (रोहा), वांगणी (खालापूर), मंगोशी प्रधानवाडी व पाडले (पेण) येथील एका घराचा समावेश आहे. तर वडविहीर-चिंचखांबाला (पोलादपूर), चोपडा व टेंभरी (खालापूर), हिरकणीवाडी व कोंझर (महाड), माकटी व निजामपूर (माणगाव), मोठी धामणी (पनवेल), जांभूळपाडा आदिवासीवाडी (उरण) आणि खारखर्डी (रोहा) येथील एकूण ११ कच्ची घरे पुर्णतः पडली आहेत. जिल्ह्यात अंशतः पडलेली घरे एकूण १०९ असून यामध्ये पक्की घरे ५१ तर कच्ची घरे ५८ आहेत. पडझड झालेल्या झोपड्यांची संख्या १३ असून यामध्ये अंशतः पडझड झालेल्या झोपड्या आठ व पूर्णतः पडझड झालेल्या झोपड्या पाच आहेत. अंशतः पडलेल्या पोल्ट्री शेड दोन आहेत. १५ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

उरण जांभूळपाडा आदिवासीवाडीत घर पडून एकाचा मृत्यू तर पेण तालुक्यातील पाडले येथे एक व्यक्ती जखमी झाला.



(छाया : धम्मशील सावंत)

### नागरिक स्थलांतरित

*दरडप्रवण/पूरप्रवण गावांमधून कॅम्प किंवा नातेवाईकांकडे स्थलांतरित केलेल्या कुटुंबांची संख्या ५९७ असून यामध्ये नागरिकांची संख्या १९२९ आहे. २८८ कुटुंबातील १०३२ व्यक्ती त्यांच्या जवळच्या नातेवाईकांकडे स्थलांतरित झाले असून २२ कॅम्पमध्ये ३०९ कुटुंब व त्यातील ८९७ व्यक्तींची व्यवस्था निवारा शेडमध्ये करण्यात आली आहे.*

### गोठे व पशुधन हानी

*बाधित गोठ्यांची एकूण संख्या ३२, त्यामध्ये पूर्णतः हानी झालेले गोठे पाच व अंशतः हानी झालेले गोठे २७ आहेत. पशुधन हानी एकूण २७ जनावरे असून त्यामध्ये मोठी जनावरे सहा व लहान जनावरे २१ आहेत.*

# पांढऱ्या कांद्याच्या भौगोलिक मानांकनावर केंद्र सरकारचे शिक्कामोर्तब

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला अखेर भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे. केंद्र सरकारच्या पेटंट विभागाने याबाबतच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. त्याचे प्रमाणपत्र १५ जुलैच्या भौगोलिक मानांकन पत्रिकेत प्रसिध्द करून केंद्र सरकारने अलिबागच्या पांढऱ्या कांद्याच्या भौगोलिक मानांकनवर शिक्कामोर्तब केले आहे.

अलिबाग तालुक्यातील नेऊली, खंडाळे, कार्ले, वाडगाव आदि आठ गावात पांढऱ्या कांद्याची लागवड केली जाते. रुचकर चव आणि औषधी गुणधर्मामुळे हा कांदा प्रसिध्द आहे. शेतकऱ्यांनी या कांद्याचे शुध्द बियाणे संवर्धित केले आहे. या कांद्याच्या लागवडीचे ऐतिहासिक दाखलेही १८८३ सालच्या कुलाबा गॅझेटमध्ये पहायला मिळतात. त्यामुळे अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला भौगोलिक मानांकन मिळावे, यासाठी सातत्याने मागणी केली जात होती.

**“ पांढऱ्या कांद्याच्या भौगोलिक मानांकनाचे प्रमाणपत्र भौगोलिक मानांकन पत्रिकेत प्रसिध्द करून केंद्र सरकारने पांढऱ्या कांद्याच्या भौगोलिक मानांकनावर शिक्कामोर्तब केले आहे. अलिबागच्या नावाने इतर पांढऱ्या कांद्याची जी राज्यात विक्री केली जाते, त्याला आता आळा बसू शकेल.**
**-डी. एस. काळभोर, उपसंचालक कृषी, रायगड**

अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला भौगोलिक मानांकन मिळावे, यासाठी गेली काही वर्षे शासनस्तरावर प्रयत्न सुरु होते. त्यासाठी कृषी विभाग, कोकण कृषी विद्यापिठ, ग्रेट मिशन गृप कन्सल्टन्सी यांच्यात एक करार करण्यात आला होता. १५ जानेवारी २०१९ ला पांढरा कांद्याच्या जीआय मानांकनासाठी नोंदणी करण्यात आली होती. मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात मुंबई येथील केंद्र सरकारच्या पेटंट रजिस्ट्रार कार्यालयात पांढऱ्या कांद्याच्या भौगोलिक मानांकन प्रस्तावाची पडताळणी करण्यात आली. त्यावेळी अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला भौगौलिक मानांकन बहाल करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र त्याचे प्रमाणपत्र मिळाले नव्हते. याबाबतचे पेटंट १५ जुलै २०२२ च्या भारत सरकारच्या जिओग्रॉफीकल इंडीकेशन जरनल नंबर १५८ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे, त्यामुळे पांढऱ्या कांद्याच्या भौगोलिक मानांकनावर शिक्कामोर्तब झाले आहे.

### आमदार रविशेठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली

# नागोठण्यातील पाणीप्रश्नी आज बैठक

**नागोठणे : प्रतिनिधी**

विभागातील पाणीपुरवठ्यासंदर्भात नागोठणे भाजपतर्फे आमदार रविशेठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि. २२) सकाळी ११ वाजता बाजारपेठेतील शिवगणेश उत्सव मंडळ हॉलमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले असून, या बैठकीला एमजीपी व रायगड जिल्हा परिषद पाणीपुरवठा अधिकारी तसेच शासनाचे महत्त्वाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीला उपस्थित राहून नागरिकांनी पाणीपुरवठ्यासंदर्भातील प्रश्न व अडचणी मांडाव्यात, असे आवाहन भाजपचे शहराध्यक्ष सचिन मोदी यांनी केले आहे.

नागोठणे व विभागातील पाणीपुरवठ्याच्या समस्येने गंभीर रूप धारण केले आहे. ग्रामपंचायतीच्या पाणी योजनेतून शहरात बरेच दिवस पाणीपुरवठा होत नव्हता. ग्रामपंचायतीने टँकरद्वारेही पाणीपुरवठा केला नाही. भाजपचे शहराध्यक्ष सचिन मोदी यांनी स्वखर्चाने जिथे गरज असेल तेथे वैकुंठ पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला. त्यामुळे शहरातील नागरिकांना काही अंशी दिलासा मिळाला.

शहर व विभागातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न नव्याने स्थापन झालेल्या सरकार मार्फत जलद गतीने व कायमचा सुटावा, यासाठी नागोठणे भाजपचा प्रयत्न असून, त्याचाच एक भाग म्हणून शुक्रवारी आमदार रविशेठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला बहुसंख्य संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सचिन मोदी यांनी नागरिकांना केले आहे.

# महाड प्रांताधिकाऱ्यांनी दिली दरडप्रवण गावांना भेट

**अलिबाग : जिमाका**

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी बुधवारी (दि. २०) पोलादपूर तालुक्यातील कातळी (कामतवाडी) आणि कोंढवी या दरडप्रवण गावांना भेट दिली.

प्रांताधिकारी पुदलवाड यांनी या वेळी दरडप्रवण भागाची पाहणी केली आणि ग्रामस्थांना अतिवृष्टीच्या कालावधीत स्थलांतरित होण्याच्या सूचना दिल्या. तसेच दरडीची लक्षणे ओळखणे, आपत्ती येण्यापूर्वी सतर्क राहणे, रेड अलर्ट, ऑरेंज अलर्ट याबाबतदेखील सविस्तर मार्गदर्शन केले. या वेळी ग्रामस्थांनी सांगितलेल्या समस्यांवर उपाययोजना कराव्यात अशा संबंधित कर्मचाऱ्यांना प्रांताधिकारी पुदलवाड यांनी सूचना दिल्या.





पोलादपूर तहसीलदार दिप्ती देसाई यांच्यासह संबंधीत मंडळ अधिकारी, तलाठी, संपर्क अधिकारी आणि ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# हर घर तिरंगा मोहिमेसाठी रायगड जिल्ह्याचे संकेतस्थळ कार्यान्वित

**अलिबाग :** हर घर तिरंगा मोहीम जिल्ह्यात राबविण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून रायगड जिल्ह्याचे संकेतस्थळ https://www.harghartirangaraigad.in/ कार्यान्वित करण्यात आले आहे.

या मोहिमेत सहभागी होणाऱ्या नागरिकांना संकेतस्थळावर नोंदणी, ध्वज विक्रेते अथवा विक्रेत्यांची नोंदणी, मोहिमेसाठी ध्वज देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांची नोंदणी करता येणार आहे. पोर्टलवर मोठ्या संख्येने नोंदणी करावी. जेणेकरून ध्वज खरेदी, वितरणाचे पुढील आवश्यक ते नियोजन जिल्हा प्रशासनास करता येईल, असे आवाहन कल्याणकर यांनी केलेय.


## ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे

ता. पनवेल, जि. रायगड

## साहित्य खरेदीसाठी निविदा सूचना

सर्व नोंदणीकृत G.S.T. धारक एजन्सी/दुकानदार/पुरवठादार यांना कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदेमध्ये ग्रामपंचायत फंडअंतर्गत खालील कामांकरिता एजन्सी/दुकानदार/पुरवठादार यांचेकडून दि. ०१/०८/२०२२ रोजी दुपारी १२.०० वा. पर्यंत लिफाफा पद्धतीने दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| साहित्याचे नाव | नग | दर प्रतिनग |
|---|---|---|
| मोठी टोप | १ | |
| वगराळे | १ | |
| स्टिल कालता | १ | |
| झारा | १ | |
| जग | १ | |
| चमचे | १ | |
| बादली | १ | |
| चौफुला | १ | |
| टफ कडीवाले | १ | |
| भात वाढणे चमचे | १ | |
| लहान टोप | १ | |
| पळी / वरणडाव | १ | |
| कावळे | १ | |
| परात | १ | |
| कढई | १ | |
| शेगडी | १ | |
| भात चाळणी | १ | |
| ढवळे | १ | |
| स्टिल टाकी | १ | |
| सिंथटेक टाकी | १ | |
| डेग झाकणीसह | १ | |
| स्पीकर सेट / मशिन | १ | |
| खुर्ची | १ | |
| इन्व्हर्टर | १ | |
| पाणी शुद्धीकरण बॉटल | १ | |
| फिनाईल बॉटल | १ | |
| सतरंजी पट्टी बसण्याकरिता | १ | |
| साऊंड बॉक्स | १ | |
| माईक | १ | |
| थंब मशिन | १ | |
| दिवाबत्ती सर्व प्रकारचे साहित्य पुरविणे | प्रति नग | |
| पाणी पुरवठा सर्व प्रकारचे साहित्य पुरविणे | प्रति नग | |
| TCL पावडर पुरविणे | प्रति बॅग | |
| चुना पावडर पुरविणे | प्रति बॅग | |
| स्टेशनरी साहित्य पुरविणे | प्रति नग | |
| डस्टबिन पुरविणे | प्रति नग | |

**अटी व शर्ती :**

१) आलेली सर्व दरपत्रके दि. ०३/०८/२०२२ रोजी दुपारी ०१.०० वाजता ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे कार्यालय येथे मा. सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील.

२) कोणतीही एक अथवा अनेक निविदा नाकारण्याचा तसेच निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवले आहेत.

३) निविदा स्विकृतीचा कालावधी सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ११ ते १ असा राहील.

४) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर साहित्य पुरवठा आदेश दिल्यापासून १ महिन्याच्या आत साहित्य पुरवठा करणे बंधनकारक राहील.

५) सदर निविदाबाबतच्या अधिक अटी व शर्ती ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे कार्यालयात पहावयास मिळतील.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे,**
**ता. पनवेल, जि. रायगड**


# रोहा तालुक्यात भात लावणी अंतिम टप्प्यात

**रोहे : प्रतिनिधी**

पाऊस समाधानकारक पडत असल्याने जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून रोहा तालुक्यात भात लावणीला वेग आला असून आता भात लावणी अंतिम टप्प्यात आहे. तालुक्यात या वर्षी ९८५० हेक्टरवर भात लावणी अपेक्षित आहे.

नदी व खाडी लगत असलेल्या झोळांबे, यशवंतखार विभागात पाणी येत असल्याने या ठिकाणी मात्र भात लावणी उशीरा होत आहे. हा अपवाद वगळता तालुक्यात ९० टक्क्याच्यावर भात लावणी झाली आहे.

या वर्षी जया, सुवर्णा, जोरदार, कोमल, वायएसआर, सारथी आदी प्रमुख बियाणांसह अन्य बियाणांची लागवड करण्यात आली आहे. तालुका कृषी विभागाच्या वतीने यावर्षी काही शेतकऱ्यांना रत्नागिरी सात हे बियाणे देण्यात आले आहे, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी दिली.

रोहा तालुक्यात पारंपरिक पध्दतीने भात लावणी होत असताना आता नव्या पध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी यांत्रिक, पट्टा, चारसुत्री, एसआरटी पध्दतीने भात लागवड केली आहे. या वर्षी भातशेतीसाठी पारंपरिक अवजारासह ट्रॅक्टर, पॉवर टिलर व अन्य यांत्रिकी अवजारांचा वापर केला आहे. नांगरणी, फवरणीसह अन्य कामे यांत्रिकी पध्दतीने होत असल्याने आता भात लागवडसुध्दा यांत्रिकी पध्दतीने झाली आहे.



(छाया : महादेव सरसंबे)

# मुरूडमध्ये विविध दाखल्यांचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराजस्व अभियानांतर्गत मुरूड तहसील कार्यालया मार्फत गुरुवारी (दि. २१) विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या विविध स्वरुपाच्या १२७ दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

मुरूड अंजुमन इस्लाम जंजीरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, विद्यालयातील सभागृहात गुरुवारी दाखले वाटप शिबिर घेण्यात आले. या शिबिरात तहसीलदार रोहन शिंदे यांच्या हस्ते उत्पन्न दाखला, डोमिसाईल सर्टिफिकेट, नॉन क्रिमीलेयर आदि दाखल्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी नायब तहसीलदार रवींद्र सानप, गोविंद कोटंबे, अमोल शिंदे, मंडळ अधिकारी खुशाल राठोड, संजय तंवर, प्राचार्य डॉ. साजिद शेख, अंजुमन इस्लाम जंजिराचे सहसचिव अब्दुल रहीम कबले, व्यवस्थापन समिती सदस्य इस्माईल शेख, प्रा. नितीन पवार, प्रा. अंजुम दाखवे, उदय सबनिस यांच्यासह तलाठी, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांना लागणारे विविध दाखले एका दिवसात मिळाल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले.



(छाया : संजय करडे)

# रायगडातील शाळांमध्ये होणार स्वच्छता माहिती केंद्रांची निर्मिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण तसेच पाणी व स्वच्छता विभागाने प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये स्वच्छता माहिती केंद्रांची निर्मिती हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. यात विद्यार्थ्यांना आरोग्य व स्वच्छतेविषयी मार्गदर्शन करण्यासोबतच शाळांमध्ये विविध सुविधा निर्माण करून देण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासाचे ओझे न वाटता शिकण्यासाठी स्वयंप्रेरित करणे हा यामागील उद्देश आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून जिल्ह्यातील शाळांमध्ये स्वच्छता माहिती केंद्राची निर्मिती हा अभिनव उपक्रम राबविण्यात येणार आहे. हा उपक्रम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, माध्यमिक शिक्षण अधिकारी जोत्स्ना शिंदे-पवार, प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत आहे.



रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण तसेच पाणी व स्वच्छता मिशन यांनी प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये स्वच्छता केंद्रांची निर्मिती या अभिनव उपक्रमाची माहिती देण्याकरिता गटशिक्षण अधिकारी, केंद्रप्रमुख यांच्याकरिता पाणी व स्वच्छता विभागामार्फत गुरुवारी (दि. २१) कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महिला बचतगट, शिक्षक व विद्यार्थी हे तीन घटक एकत्र येऊन काम करतील तेव्हा सामाजिक क्रांती निर्माण होईल. या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड, सागरमित्र संस्थेचे विनोद बोधणकर, युनिसेफ प्रतिनिधी जयंत देशपांडे उपस्थित होते.

### शाळांनी राबविण्याचे उपक्रम

*दहा विद्यार्थी, एक शिक्षक यांना स्वच्छता प्रशिक्षण, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, दिव्यांगस्नेही स्वच्छतागृह निर्मिती, इन्सीनेटर मशीन, हँडवॉश स्टेशन, परसबाग, स्वच्छतागृहात नळ जोडणीद्वारे पाणीपुरवठा, परसबागा, शोषखड्ड्यांची निर्मिती, प्लास्टिक संकलन केंद्र व कचराकुंडीची व्यवस्था, मासिक पाळीदरम्यान रेस्टरुम, सॅनिटरी पॅड, वाचनीय पुस्तकांची उपलब्धता, भिंतीवर सचित्र स्वच्छता संदेश, सॅनिटेशन पार्क, रेन वॉटर हार्वेस्टिंगची सुविधा निर्मिती, वृक्ष लागवड, ऑक्सिजन पार्कची निर्मिती.*


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## Extension to E –TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs. 500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000023390** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/Re-e-Tender-36/2022-2023.** Extension to Rfx Re-e-tender for work of replacement of existing rusted and old earth wire of 220kV Apta– Uran 1 & 2 Lines under EHV Lines S/dn.Panvel under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 19,23,823/-, EMD amount Rs. 19,238/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **21.07.2022, 18:00 Hrs. to 28.07.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 28.07.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **29.07.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022-2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M. C. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V. (O&M) DIVN. PANVEL**

# यतिंदर सिंगने मालदीव जिंकले

## शेवटच्या दिवशी भारताने सुवर्ण पदकांचा ठोकला षटकार

**माफुशी (मालदीव) : वृत्तसंस्था**

५४ व्या आशियाई शरीरसौष्ठव स्पर्धेवर भारतानेच वर्चस्व गाजवले. भारताच्या यतिंदर सिंगने 'आशिया श्री'चा चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्सचा बहुमान पटकावला. यतिंदरबरोबर भारताने गुरुवारी (दि. २१) सातपैकी सहा सुवर्ण जिंकले. भारताने आपली सर्वोत्तम कामगिरी करीत १३ सुवर्ण पदकांसह विक्रमी ३८ पदके जिंकली. यात १६ रौप्य आणि नऊ कांस्य पदकांचा समावेश आहे.

आशियाई शरीरसौष्ठव स्पर्धेतील पहिले सुवर्ण भारताने जिंकून दमदार सुरुवात केली होती, तर गुरुवारी स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावून शेवटही गोड आणि संस्मरणीय केला. एकंदर मुख्य शरीरसौष्ठव स्पर्धेचे सात गट गुरुवारी खेळविले गेले.




### सांघिक विजेतेपदावर भारताची मोहोर

*मालदीव गाजवले ते भारतीय खेळाडूंनी. पहिल्या स्पर्धेपासून शेवटच्या स्पर्धेपर्यंत भारताच्या खेळाडूंनी आपली ताकद जगाला दाखवली. या स्पर्धेत सर्वात मोठा ८१ खेळाडूंचा संघ भारताचाच होता आणि त्यापैकी ३८ खेळाडूंनी पदके जिंकली, ही सर्वात मोठी अभिमानाची बाब आहे. १३ सुवर्ण, १६ रौप्य आणि ९ कांस्य जिंकत भारताने १,३३० गुणांसह सांघिक विजेतेपदही काबीज केले. ७६० गुणांसह थायलंड सांघिक उपविजेता ठरला तर इराणने तिसरे स्थान मिळविले.*

त्यापैकी सहा गटात भारतीयांनी बाजी मारली.

७० किलो वजनी गटात हरीबाबूने पटकावले. ८० किलोत अश्विन शेट्टी, ८५ किलोमध्ये यतिंदर, ९० किलोमध्ये एम. सर्वानन, १०० किलोच्या गटात कार्तिकेश्वर, तर १०० किलोवरील गटात चारही खेळाडू भारतीय असल्यामुळे यात अनुज कुमार तालियान विजेता ठरला. अशाप्रकारे चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्सच्या लढतीत भारताचाच खेळाडू बाजी मारणार हे स्पष्ट होते. यात यतिंदरने आपल्या कारकीर्दीतील सर्वोत्तम कामगिरी केली. आशिया श्री जिंकायचीच, हे माझे स्वप्न होते आणि ते मी साकार केले. आता पुढचे ध्येय मि. वर्ल्ड आहे. तेसुद्धा चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्सचेच, असे उद्‌गार यतिंदरने काढले.

# वर्ल्ड अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिप भालाफेकीत अन्नू राणी फायनलमध्ये

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची महिला भालाफेकपटू अन्नू राणी सलग दुसर्‍यांदा वर्ल्ड अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये पोहचली आहे. अन्नूने शेवटच्या प्रयत्नात ५९.६० मीटर भालाफेक करीत अंतिम फेरी गाठली.

अन्नूने आपल्या पहिल्याच प्रयत्नात फाऊल केला, तर दुसर्‍या प्रयत्नात ५५.३५ मीटर भाला फेकला. त्यामुळे तिचे आव्हान संपुष्टात येण्याची चिन्हे दिसत होती, मात्र तिसर्‍या प्रयत्नात तिने ५९.६० मीटर भाला फेकून आपले आव्हान जिवंत ठेवले. ती तिसर्‍या प्रयत्नात तिचा भाला ६० मिटर मार्कच्या फक्त ४० सेंमी मागे राहिला. ती पात्रता फेरीत ग्रुप बी मध्ये पाचव्या स्थानावर राहिली. पात्रता फेरीतील दोन गटातून सर्वोत्तम आठ भालाफेकपटू अंतिम फेरीसाठी निवडले गेले. त्यात अन्नूने स्थान पटकावले.

२९ वर्षांच्या अन्नू राणीच्या नावावर भालाफेकीत राष्ट्रीय विक्रमाची नोंद आहे, मात्र तिला वर्ल्ड अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये ६० मीटरचा मार्क गाठण्यात अपयश आले आहे. आता राणीला शनिवारी (दि. २३) होणार्‍या अंतिम फेरीत आपल्या खेळात सुधारणा करावी लागणार आहे. तिची ६३.८२ मीटर ही वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी आहे. जे भालाफेकपटू ६२.५० मीटरचा



मार्क पार केला आहे ते थेट फायनलसाठी पात्र झाले. असे तीनच खेळाडू थेट पात्र झाले आहे.


अन्नूने सलग दोन वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये सहभागी होणार आहे. अन्नू राणीची ही तिसरी वर्ल्ड अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिप आहे. ती २०१९ दोहा येथे झालेल्या वर्ल्ड अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत ६१.१२ मीटर भालाफेक करत अंतिम फेरीत आठव्या स्थानावर राहिली होती. ती २०१७च्या वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या फायनलसाठी पात्र झाली नव्हती. अन्नूच्या नावावर ६३.८२ मीटर भालाफेकीचा राष्ट्रीय विक्रम आहे. मे महिन्यात जमशेदपूर येथे झालेल्या इंडियन ओपन भालाफेक स्पर्धेत तिने सुवर्ण पदक पटकावत राष्ट्रीय विक्रम केला होता.

# जगज्जेतेपदाच्या लढतीत रस नाही

## मॅग्नस कार्लसनची वर्ल्ड चेस चॅम्पियनशिपमधून माघार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जगज्जेतेपदाच्या लढतीत रस नसल्याचे स्पष्ट करीत नॉर्वेचा विश्वविजेता बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर मॅग्नस कार्लसनने ग्रँडमास्टर इयान नेपोमनिशीविरुद्ध पुढील वर्षी सामना न खेळण्याचा निर्णय बुधवारी (दि. २०) घेतला. त्यामुळे आव्हानवीर स्पर्धेतील विजेत्या नेपोमनिशीला जागतिक अजिंक्यपदासाठी उपविजेत्या ग्रँडमास्टर डिंग लिरेनशी सामना करावा लागणार आहे.



'मी फिडे आणि माझ्या चमूसह इयानसमवेत चर्चा केली आहे. मला या सामन्यातून काही साध्य होईल, असे वाटत नाही. ऐतिहासिक कारणास्तव सामना मनोरंजक असेल याची मला खात्री असली तरी, माझा खेळण्याचा विचार नाही आणि मी सामना खेळणार नाही,' असे पाच वेळा जगज्जेत्या कार्लसनने सांगितले. डिसेंबर २०२१मध्ये जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कार्लसनने नेपोमनिशीला ७.५-३.५ असे नामोहरम करीत पाचव्यांदा जगज्जेतेपद प्राप्त केले होते. यंदा नेपोमनिशी माद्रिद येथे झालेल्या आव्हानवीर स्पर्धेत जेतेपद मिळवत जगज्जेतेपदाच्या लढतीसाठी सज्ज झाला होता, पण कार्लसनच्या माघारीमुळे त्याला लिरेनविरुद्धच्या लढतीसाठी तयारी करावी लागणार आहे. जागतिक लढतीत सहभागी होणार नसलो तरीही आपण खेळातून निवृत्ती घेणार नसल्याचे कार्लसनने स्पष्ट केले.

# आशियाई युवा वेटलिफ्टिंग स्पर्धेत निकिताला रौप्य

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आशियाई युवा वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या निकिता कमलाकरने बुधवारी (दि. २०) रौप्यपदकाची कमाई केली.

ताश्कंद (उझबेकिस्तान) येथे सुरू असलेल्या वेटलिफ्टिंग स्पर्धेत निकिताने ५५ किलो वजनी गटात ६८ किलो स्नॅच आणि ९५ किलो क्लीन-जर्क असे एकूण १६३ किलो वजन उचलले. गेल्या महिन्यात मेक्सिको येथे झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत निकिताचे पदक थोडक्यात हुकले होते, परंतु बुधवारी तिने हे यश मिळवल्यानंतर कमलाकर कुटुंबीयांनी आनंद व्यक्त केला. तिचे अपंग वडील तेरवाड (ता. शिरोळ) येथे चहाचे विक्रेते आहेत, तर आई खासगी रुग्णालयात नोकरी करते. तिच्या यशाबद्दल तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# धो-धो पावसातही भारतीय संघाचा सराव

**त्रिनिदाद : वृत्तसंस्था**

इंग्लंड विरुद्धची टी-२० आणि एकदिवसीय मालिका जिंकून भारतीय संघ कॅरेबियन बेटांवर गेला आहे. तिथे वेस्ट इंडीज विरुद्ध तीन एकदिवसीय आणि पाच टी २० सामन्यांच्या दोन मालिका भारतीय संघाला खेळायच्या आहेत. शुक्रवारपासून (दि. २२) एकदिवसीय मालिकेला सुरुवात होणार आहे. त्यापूर्वी भारतीय संघाने सराव सुरू केला आहे, मात्र त्रिनिदादमधील पावसाने भारताच्या सराव सत्रात अडथळा आणला.

भारतीय संघ बुधवारी त्रिनिदादला पोहोचला. त्यामुळे सामन्यापूर्वी मिळालेल्या वेळेचा फायदा करून घेण्यासाठी सराव सत्राचे आयोजन केले होते, मात्र जोरदार पावसाने हजेरी लावली. यावर उपाय म्हणून प्रशिक्षक राहुल



द्रविड यांनी इनडोअर नेटमध्ये संघाचा सराव घेतला. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आपल्या अधिकृत ट्विटर अकाउंटवर याचा व्हिडीओ शेअर केला आहे.

एकदिवसीय मालिकेत शिखर धवन भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. या मालिकेसाठी रोहित शर्मा, विराट कोहली आणि जसप्रीत बुमराह यांना विश्रांती देण्यात आली आहे. या मालिकेतील तिन्ही सामने क्वीन्स पार्क ओव्हल मैदानावर होणार आहेत.

# पनवेल मनपाच्या वतीने जिल्हा क्रीडा स्पर्धा सुरू

**पनवेल : प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत पनवेल महानगरपालिका व रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा २०२२-२३ला गुरुवारी (दि. २१) कर्नाळा स्पोर्ट्स येथे सुरुवात झाली. या स्पर्धेचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या हस्ते झाले.

यावेळी क्रीडा विभाग प्रमुख नामदेव पिचड मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, तालुका क्रीडा मार्गदर्शक



मनिषा मानकर, सचिन निकम, समीर रेवाळे उपस्थित होते.

गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाकाळामुळे स्थगित झालेल्या जिल्हा क्रीडा स्पर्धांना स्पर्धकांचा मोठा प्रतिसाद लाभला आहे. स्पर्धेच्या उद्घाटनानंतर मान्यवरांच्या हस्ते नाणेफेक करून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या वेळी मान्यवरांनी उपस्थित संघातील खेळाडूंची ओळख करून घेतली व त्यांना शुभेच्छा दिल्या.

१४-१७ वर्षे वयोगटातील या स्पर्धेंतर्गत रायगड जिल्ह्यातील व पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध शाळा व कनिष्ठ विद्यालयातील सुमारे ४० संघांनी सहभाग घेतला असून २१ ते २८ जुलैपर्यंत या स्पर्धा होणार आहेत. १७ वर्षांखालील मुले,१४ वर्षांखालील मुले, १७ वर्षांखालील मुली अशा तीन गटात या स्पर्धा होणार आहेत.

या स्पर्धेतील विजेते संघ पुढे राज्य स्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावर खेळावयास जाणार आहेत.



# पुजाराला लॉर्ड्‌सवर मिळाले 'स्टँडिंग ओवेशन'

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

भारताचा कसोटी खेळाडू चेतेश्वर पुजारा यंदाचा काऊंटी हंगाम गाजवत आहे. ससेक्सकडून खेळणार्‍या पुजाराने हंगामातली आफले पाचवे शतक ठोकले. पुजाराने हे द्विशतक लॉर्ड्स क्रिकेट ग्राऊंडवर मिडिलसेक्सविरूद्ध ठोकले. त्याने ४०३ चेंडूंचा सामना करीत २३१ धावा केल्या. द्विशतक ठोकून बाद झाल्यानंतर पॅव्हेलियनमध्ये परतत असताना लॉर्ड्सवरील प्रेक्षकांनी पुजाराला स्टँडिंग ओवेशन दिले. याबाबतचे फोटो लॉर्ड्सने आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर केले.

# श्रीलंकेने आशिया कपचे यजमानपद नाकारले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

या वर्षी होणार्‍या आशिया कपचे यजमानपद श्रीलंका भूषवत होती, परंतु आर्थिक संकटामुळे ते स्पर्धेचे आयोजन करू शकणार नाही. श्रीलंका क्रिकेटने बुधवारी (दि. २०) आशियाई क्रिकेट परिषदेला ही माहिती दिली. आर्थिक आणि राजकीय कारणांमुळे टी-२० आशिया चषक आयोजित करण्याच्या स्थितीत नाही, असे सांगण्यात आले. अशा स्थितीत आशिया चषक यूएई किंवा भारतामध्ये खेळल्या जाऊ शकते.

आशिया चषक यावर्षी श्रीलंकेत होणार होते, परंतु देशात आर्थिक संकट अजूनही आहे. ६० लाखांहून अधिक लोकांसमोर अन्नधान्याचे संकट उभे राहिले आहे.

आशिया चषक २०१८पासून कोणत्या ना कोणत्या कारणाने पुढे ढकलण्यात आले आहे. गेल्या तीन वर्षांपासून कोरोनामुळे होऊ शकला नाही. अशा स्थितीत आशियाई क्रिकेट परिषदेला या वेळी ही स्पर्धा कोणत्याही परिस्थितीत आयोजित करायची आहे. श्रीलंकेने यजमानपद नाकारल्यामुळे ही स्पर्धा या वर्षी भारतामध्ये किंवा यूएईमध्ये खेळवली जाऊ शकते. भारत, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका आणि अफगाणिस्तान यांसारखे मोठे संघ २६ ऑगस्टपासून होणार्‍या आशिया कपमध्ये सहभागी होणार आहेत.




# द्विराष्ट्रीय मालिकांपेक्षा लीग क्रिकेट उपयुक्त -रवी शास्त्री

**लंडन : वृत्तसंस्था**



दौरे-स्पर्धांची कार्यक्रमपत्रिका जुळवताना सर्वच राष्ट्रांच्या क्रिकेट मंडळांची दमछाक होते. त्यामुळे द्विराष्ट्रीय ट्वेन्टी-२० मालिकांच्या संख्येत कपात करून लीग क्रिकेटला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, अशी सूचना भारताचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी केली आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) आगामी दौरे-स्पर्धा कार्यक्रमपत्रिकेत ट्वेन्टी-२० सामन्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. प्रत्येकी वर्षी अडीच महिन्यांचा कार्यकाळ आयपीएल ट्वेन्टी-२०साठी राखून ठेवण्यात आला आहे. सामन्यांची संख्या वाढल्यामुळे क्रिकेटच्या बहुप्रकारांमध्ये खेळणार्‍या खेळाडूंवरील खेळाचा ताण वाढला आहे. 'ट्वेन्टी-२० प्रकारातील मालिकांची संख्या कमी व्हायला हवी. लीग क्रिकेट मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे आयसीसी ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमधील थरार आणखी वाढेल,' असे त्यांनी सांगितले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com